दैनिक
लोकरक्षणाय
लोकशाहीच्या संरक्षणार्थ

www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com + 91 97023 86118

●कार्यकारी संपादक- अनिकेत घनश्याम भंकाळ ●वर्ष-०१,अंक-२९० ●पृष्ठे-०४ ●ठाणे, मंगळवार, ९ एप्रिल २०२४ ●RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ●रु.२/-

शिंदेंच्या बालेकिल्ल्यात भाजपचे शक्तीप्रदर्शन

■ठाणे, विशाल कारंडे,

ठाण्यातील भाजपच्या नव्या भव्यदिव्य ठाणे जिल्हा विभागीय मुख्यालयाचे अनावरण गुढी पाडव्याच्या मुहूर्तावर राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लोकार्पण केले जाणार आहे. यावेळी भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित राहणार आहेत. कार्यालयाच्या उद्घाटनाच्या निमित्ताने भाजप शहरात जोरदार शक्तिप्रदर्शन करणार आहे. एकीकडे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासाठी प्रतिष्ठेच्या असलेल्या ठाणे लोकसभा मतदारसंघावर भाजपने दावा ठोकलेला असताना आणि त्यासंबंधीचा तिढा सुटलेला नसताना भाजप ठाण्यात जोरदार शक्तीप्रदर्शन करत ठाण्याचे 'ठाणेदार' आपणच असल्याचे अप्रत्यक्षरित्या सांगताना दिसेल. ठाणे शहरातील पोखरण रोड क्रमांक एक येथे असलेल्या या कार्यालयाच्या सभोवतीचा परिसर आजपासूनच भाजपच्या झेंड्यांनी वेढला आहे. या अनावरण सोहळ्याच्या निमित्ताने भाजप पदाधिकाऱ्यांची बैठक कार्यालयात सुरु असून ठाण्यातील कार्यक्रम आटोपून उपमुख्यमंत्री फडणवीस बदलापूर येथे भाजप आमदार किसन कथोरे यांच्या कार्यालयाच्या उद्घाटनाला रवाना होणार असल्याचे वरिष्ठ भाजप नेत्यांनी सांगितले. कल्याण लोकसभेसाठी श्रीकांत शिंदे यांची उमेदवारी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घोषित केल्याने, आता ठाणे लोकसभा मतदारसंघ हिसकाविण्यासाठी भाजप जोरदार तयारी करत आहे. पडद्यामागे त्यासंबंधीची रणनीती आखण्यात येत आहे. त्याच रणनीतीचा भाग म्हणून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कल्याणमधून श्रीकांत शिंदे यांची उमेदवारी जाहीर करून ठाण्यात भाजपचा अप्रत्यक्षरीत्या दावा असल्याचे सांगितले.

ठाणे लोकसभेसाठी शिंदे गट आणि भाजपमध्ये सुरू असलेल्या रस्सीखेचादरम्यान मेळावे, बैठकांमध्ये वाढ झाली आहे. महायुतीच्या कोपरी-पाचपाखाडी, ओवळा-माजिवडा विधानसभा मतदारसंघातील मेळाव्यानंतर शिवसेना शिंदे गटाचा मेळावा ठाणे शहर विधानसभा मतदारसंघात पार पडला. महागिरी, टेंभी नाका, श्रीरंग, वृंदावन, जांभळी नाका बाजारपेठ परिसर आणि पाचपाखाडी, सिद्धेश्वर तलाव, टेकडी बंगला, खोपट परिसर येथील शिवसैनिकांचे स्वतंत्र मेळावे घेण्यात आले. ठाणे शहर विधानसभेचे प्रतिनिधित्व भाजप आमदार संजय केळकर करतात. त्यांच्या मतदारसंघात शिवसैनिकांनी या मेळाव्याच्या निमित्ताने जोरदार शक्तिप्रदर्शन केले. यावेळी आमदार प्रताप सरनाईक, माजी आमदार रवींद्र फाटक, ठाणे जिल्हाप्रमुख नरेश म्हस्के व पदाधिकारी उपस्थित होते. या मेळाव्यामध्ये महायुतीच्या उमेदवाराला विक्रमी मताने निवडून आणणार, असा निर्धार करण्यात आला. भारतीय जनता पक्ष तळागाळात रुजण्याच्या दृष्टीने देशात प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी भाजपचे स्वतःच्या मालकीचे पक्ष कार्यालय असावे, या हेतूने गेल्या काही वर्षात अनेक ठिकाणी भाजप जिल्हा मुख्यालय उभारण्यात आली. याच धर्तीवर ठाण्यातही भाजपचे नवे प्रशस्त ठाणे जिल्हा विभागीय मुख्यालय उभारण्यात आले आहे. जिल्हास्तरीय बैठका, विविध कार्यक्रम, नेत्यांच्या पत्रकार परिषद याठिकाणी होणार असून उत्तम दालन, कॉन्फरन्स रुम, पार्किंगची व्यवस्था याठिकाणी करण्यात आली असून एखाद्या कॉर्पोरेट कार्यालयाच्या धर्तीवर या मुख्यालयाची रचना करण्यात आली आहे. भाजपचे माजी राज्यसभा खासदार, ठाणे लोकसभाप्रमुख डॉ. विनय सहस्त्रबुद्धे यांनी 'एक्स'वर पोस्ट करुन याठिकाणी भेट देत येथील सोयीसुविधांबद्दल आढावा घेतल्याचे नमूद केले.

पुण्यात मनी लॉन्ड्रींगचे अरेस्ट वॉरंट निघाल्याचे सांगत ४० लाखांची फसवणूक

■पुणे, अभिजीत येरुल्लू :

मनी लॉन्ड्रींग प्रकरणात अटक वॉरंट निघाल्याचे सांगत एका व्यक्तीकडून ४० लाख रुपये घेत फसवणूक करण्यात आली. हा प्रकार २१ आणि २२ मार्च रोजी वाकड येथे घडला. सत्यजित वीरेंद्र कुमार वय (वय ४६, रा. पार्क स्ट्रीट, वाकड) यांनी याप्रकरणी वाकड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार अज्ञातांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी फियार्दी सत्यजित यांना 8808208924 या क्रमांकावरून संपर्क केला त्यांना स्काईप ॲपच्या MUMBAIPOLICE 39 आणि MUMBAI CBI या आयडी वरती जॉईन होण्यास सांगितले. सत्यजित यांच्याविरुद्ध मनी लॉन्ड्रींगची केस झाली असून त्याबाबत त्यांच्या विरोधात अटक वॉरंट निघाले आहे. रद्द करण्यासाठी सिक्युरिटी रक्कम भरावी लागेल. आम्ही आपण केलेल्या मनी लॉन्ड्रींग मध्ये केलेल्या गुंतवणुकीचा तपास करणार आहोत. जोपर्यंत हा तपास सुरू आहे तोपर्यंत आपण नॅशनल सिक्रेट रुलनुसार कोणाशीही काहीही बोलू शकत नाही, असे आरोपींनी सत्यजित यांना सांगितले. त्यानंतर सत्यजित यांच्याकडून आरोपींनी ४० लाख रुपये ट्रान्सफर करून घेत त्यांची फसवणूक केली. यापुढील तपास वाकड पोलीस करीत आहेत.

रस्ता खड्डेमय झाल्यास महापालिका करणार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई

■मुंबई, यश सावंत :

रस्त्यांवरील खड्डयांमुळे मुंबई महापालिकेला सर्वसामान्य ते न्यायालयाच्या टीकेला सामोरे जावे लागते. यंदा ही टीका टाळण्यासाठी मुंबई महापालिका कठोर पावले उचलण्याच्या तयारीत आहे. पावसाळ्यात रस्त्यावर खड्डे पडल्यास महापालिका केवळ कंत्राटदारालाच नाही, तर यावेळी महापालिका अभियंत्यांवरही जबाबदारी निश्चित केली जाणार आहे.

रस्त्यावर खड्डे झाल्यानंतर ते वेळेवर भरणे आणि भरलेले खड्डे पुन्हा होणार नाहीत याची काळजी घेण्याची जबाबदारी अभियंत्यांची असेल. यात कुचराई झाल्यास त्यांना कारवाईला सामोरे जावे लागणार आहे. खड्डे वेळेवर न भरल्यास महापालिका अभियंत्याला दंड ठोठावण्याची कारवाई महापालिकेने २०१० मध्ये केली होती. त्यावेळी पालिका अभियंत्यांच्या संघटनांनी जोरदार विरोध केला होता. मुंबई महापालिकेच्या रस्ते विभागाकडून पावसाळ्याआधी मेपासूनच खड्डे बुजवण्याच्या कामाला

सुरुवात केली जाते. सप्टेंबरपर्यंत हे काम जोमाने सुरू असते. मात्र ही समस्या कायम राहते. खड्डे युद्धपातळीवर बुजवावेत, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जुलै २०२३मध्ये मुंबई महापालिकेला दिले होते.

या निर्देशानंतर खड्डे बुजवण्याची मोहीमही पालिकेने हाती घेतली होती. प्रत्येक विभागस्तरावर सहायक आयुक्तांना खड्डे बुजवण्यासाठीच्या कामाचे समन्वय अधिकारी म्हणूनही नेमणूक केली होती. यंदा मुंबईकरांच्या रोषाला सामोरे जाण्याची वेळ येऊ नये, यासाठी मुंबई महापालिकेकडून विविध उपाययोजना केल्या जात आहेत. रस्त्यांची दुरुस्ती आणि रस्त्यावरील खड्डे बुजवण्याची जबाबदारी कंत्राटदाराची आहे, असे महापालिकेच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

रस्त्याचे बांधकाम करताना दजेर्दार व नियमानुसार काम केल्यास रस्त्यांची दुरवस्था होणार नाही आणि रस्त्यांवर खड्डेही पडणार नाहीत. तसेच रस्त्यांवर खड्डा दिसल्यानंतर त्याच्या दुरुस्तीच्या वेळी त्यावर लक्ष ठेवण्याची जबाबदारी महापालिका अभियंत्यांची आहे. दुरुस्तीनंतर किंवा रस्त्यांवरील खड्डे बुजवल्यानंतर पुन्हा रस्ता खराब झाला, तर त्याला कंत्राटदाराइतकेच महापालिका अधिकारी जबाबदार आहेत.

त्यामुळे रस्ते अभियंता यांचीही जबाबदारी निश्चित झाली पाहिजे, याद्दष्टीने कारवाईचा विचार केला जात असल्याचे सांगण्यात आले. या वेळी पावसाळ्यात रस्त्यांवरील खड्डे१२ तासांत बुजवाण्याचा प्रयत्न असणार आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

ठाणे जिल्ह्यातील ३६ मतदान केंद्रांचे नियंत्रण महिलांकडे

■ठाणे, दिगंबर जाधव,

जिल्ह्यात सर्वाधिक ३६ मतदान केंद्राचे नियंत्रण हे महिलांकडे असणार आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने 'महिला नियंत्रित मतदान केंद्र' स्थापित करण्याचे आदेश दिले असून प्रत्येक मतदारसंघात महिलांनी चालविलेले महिला मतदान केंद्र अशी यामागची संकल्पना

आहे. मतदान प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढावा, यासाठी महिला नियंत्रित मतदान केंद्र ही संकल्पना पुढे आली असून संवेदनशील केंद्र टाळून तहसील कार्यालय, पोलीस स्टेशननजीकच्या केंद्रांची तसेच ज्या मतदान केंद्रांवर निवडणूक प्रक्रियेतील अधिकाऱ्यांचा कायम संपर्क राहील, अशा केंद्राची या विशेष प्रयोगाकरिता निवड करण्यात येणार आहे. राज्यात यावेळी ४४० मतदान केंद्रांचे नियंत्रण महिला करणार आहेत. ठाणे जिल्ह्यात सर्वात जास्त म्हणजे एकूण ३६ मतदान केंद्रांचे नियंत्रण महिलांकडे असणार आहे. या मतदान केंद्रांमध्ये तैनात असलेल्या पोलिसांपासून ते निवडणूक कार्यावर असलेल्या अधिकारी आणि कर्मचारी यांच्यासह सर्वजण महिला असतील. लैंगिक समानता आणि मतदान प्रक्रियेत महिलांच्या अधिक रचनात्मक सहभागासंबंधातील वचनबद्धतेचा भाग म्हणून आगामी लोकसभा निवडणुकीसाठी महिलांनी चालविलेले महिला मतदान केंद्र असणार आहेत. सर्व महिला नियंत्रित मतदान केंद्रात कोणताही विशिष्ट रंग वापरला जाणार नाही तसेच मतदान केंद्रातील कुठल्याही खास राजकीय पक्षाच्या रंगाचा अनावश्यक वापर टाळण्याचे स्पष्ट निर्देश निवडणूक आयोगाने दिले आहेत. 'महिला नियंत्रित मतदान केंद्र' स्थापन करण्याच्या निर्णयामुळे महिलांचा मतदानातील सहभाग वाढण्यास मदत होणार आहे. महिला नियंत्रित मतदान केंद्रावर अधिकारी, कर्मचारी या महिलाच असणार आहेत. महिला मतदान केंद्र निवडताना केंद्राची सुरक्षितता लक्षात घेतली जाणार आहे. संवेदनशील केंद्र टाळून तहसील कार्यालय, पोलीस स्टेशननजीकच्या केंद्रांची तसेच ज्या मतदान केंद्रांवर निवडणूक प्रक्रियेतील अधिकाऱ्यांचा कायम संपर्क राहील, अशा केंद्राची या विशेष प्रयोगाकरिता निवड करण्यात येणार आहे.

शहरातील रस्त्यांखाली केलेल्या कामांचे डिजिटल मॅपिंग करण्याचा महापालिकेचा निर्णय

■भाईंदर, सचिन कदम :

मीरा -भाईंदर शहरात गेल्या अनेक वषार्पासून रस्त्यांखाली वेगवेगळ्या प्रकारच्या वाहिन्या टाकण्यात आल्या आहेत. विकासकामांसाठी व इतर कामासाठी नवीन वाहिन्या टाकताना या वाहिन्या माहीत पडत नसल्यामुळे नुकसान होते. त्यामुळे रस्त्याखाली केलेल्या कामाचे डिजिटल मॅपिंग करण्याचा महापालिकेने निर्णय घेतला आहे.

मीरा भाईंदर शहरात गेल्या काही वर्षांत झालेल्या विकासकामांच्या रुपरेषा डिजिटल मॅपिंग करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला असून, त्यामुळे सध्याच्या किंवा भविष्यात रस्ते खोदाईदरम्यान झालेल्या कामांचे होणारे नुकसान आणि वाया जाण्यास आळा बसू शकेल. मीरा भाईंदर शहर हे मुंबईच्या सीमेला लागून असल्याने गेल्या दशकभरात मीरा भाईंदर शहराचा वेगाने विकास होत आहे. झपाट्याने होणारा विकास आणि लोकसंख्या

वाढ पाहता नागरिकांना मूलभूत सुविधा देण्यासाठी अनेक योजना राबविण्यासाठी रस्ते खोदले जातात. शहरातील रस्त्यांखाली पाणी पुरवठ्याची पाइपलाइन अनेक वषार्पूर्वी टाकण्यात आली होती.

या टाकलेल्या पाईप लाईनचा नियोजित नकाशा नाही. याशिवाय एलपीजी पाईपलाईन, इंटरनेट लाईन, वीज पुरवठा लाईन इत्यादी देखील रस्त्याखाली टाकण्यात आल्या आहेत. वषार्पूर्वी टाकलेल्या या सर्व मार्गांचा सुनियोजित नकाशा नसल्यामुळे एक काम करताना दुसरे

> "शहरातील रस्त्यांच्या अंतर्गत झालेल्या कामांचे मॅपिंगचे काम ठेकेदाराच्या मदतीने केले जाणार आहे. त्यासाठी राज्य शासनाच्या सेवा वाहिनी विकासांतर्गत महापालिकेला निधी मंजूर करण्यात आला आहे. प्रशासनाने यासाठी विशेष सल्लागाराचीही नियुक्ती केली असून त्यानुसार हे काम सुरू करण्यात आले आहे. लवकरच हे काम पूर्ण करून या डिजिटल मॅपिंगची रूपरेषा आयुक्तांसमोर मांडण्यात येणार आहे."
>
> -दीपक खांबित, शहर अभियंता, मीरा भाईंदर महापालिका

काम खराब होते. गेल्या काही दिवसापासून सूर्या प्रकल्पातून मिळणारे पाणी शहराच्या अंतर्गत भागात नेण्यासाठी पाइपलाइन टाकण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. तसेच गेल्या दहा वषार्पासून रस्त्याखाली ड्रेनेज लाईनचे पाईप टाकण्याचे काम सुरू आहे. यामध्ये देखील अनेक वेळा पाण्याच्या पाइप लाईन फुटल्या आहेत. पाण्याच्या पाईपलाईनचे काम करताना गॅस पुरवठा पाईप तुटल्याचे किंवा विद्युत काम करताना पाण्याची पाईपलाईन तुटल्याचे अनेकवेळा दिसून आले आहे. रस्ते खोदताना अशा घटना अनेकदा घडताना दिसल्या आहेत. याचा फटका नागरिकांसोबतच संबंधित विभागांनाही सहन करावा लागत आहे. त्याद्दष्टीने महापालिका आयुक्त संजय काटकर यांनी रस्त्यांच्या अंतर्गत झालेल्या कामांचे डिजिटल मॅपिंग करण्यास सुरू केले आहे.

डिजिटल मॅपिंगच्या माध्यमातून रस्त्यांच्या अंतर्गत झालेल्या सर्व विकासकामांचे सर्वेक्षण करून त्याचा डिजिटल नकाशा तयार करण्यात येणार आहे, जेणेकरून एका कामासाठी रस्ता खोदताना इतर कामांचे नाहक नुकसान होऊ नये. सर्वेक्षण आणि डिजिटल मॅपिंगसाठी सल्लागार नेमण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे.

गतिमंद केंद्रातील विशेष मुलांनी बनवलेल्या गुढी पोहोचल्या अमेरिकेत

■ठाणे, नितीन देवळेकर :

विश्वास गतिमंद केंद्रातील विशेष मुलांनी आपल्या क्लपकतेतून बनविलेल्या मिनी गुढींकडे अमेरिकेतील भारतीयांचे लक्ष वेधले असून या मिनी गुढी

चक्क अमेरिकेत भेटवस्तू देण्यासाठी गेल्या आहेत. या विशेष मुलांच्या कला कौशल्यांचे ठाण्याबरोबर अमेरिकेतही कौतुक होत आहे. आठ मिनी गुढी या अमेरिकेत राहणाऱ्या भारतीयांनी खरेदी केल्या आहेत. सर्वसामान्य मुलांप्रमाणे विशेष मुलांच्या अंगी देखील कला कौशल्य दडलेले असते या कला कौशल्यांना वाव मिळावा आणि भविष्यात त्यांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी या उद्देशाने विश्वास गतिमान केंद्र कडून विविध वस्तू बनवून त्यांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करुन दिल्या जातात. गेली ३४ वर्षे संस्था सण - उत्सवाच्या पार्श्वभूमीवर विविध वस्तू तयार करत असते. दरवर्षीप्रमाणे यंदाही गुढीपाडव्याच्यानिमित्ताने या विशेष मुलांनी मिनी गुढी तयार केल्या आहेत. लाल, निळा, हिरवा, भगवा, जांभळा, गुलाबी अशा विविध रंगांच्या खणाच्या कापडापासून तब्बल १०० मिनी गुढी मुलांनी तयार केल्या. या गुढींना सजवले ते सोनेरी, मोती आणि गोंड्यांची माळ, चंदेरी रंगांचा गडू, नारळ, स्वस्तिक आदींनी. एक फुटांच्या या गुढी असून त्या अधिकच आकर्षक दिसत आहेत. या केंद्रातील २२ मुलांनी मुख्याध्यापिका मीना क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली या गुढी तयार केल्या आहेत. मुलांच्या हाताला सवय झाली आहे त्यामुळे त्यांना एकदा सांगितले की, दुसऱ्या क्षणाला ते बनवायला घेतता. या मिनी गुढी बनविण्याचे यंदाचे हे ३४ वे वर्षे आहे. काळानुसार फक्त कापडात बदल होत गेला. या गुढी बनविताना मुलांच्या चेहऱ्यावर आनंद होता अशा भावना क्षीरसागर यांनी व्यक्त केल्या. सर्वसामान्यांप्रमाणे खाजगी कंपन्यांनीही या गुढी खरेदी केल्याचे त्यांनी सांगितले. मिनी गुढीप्रमाणे खणांच्या या मुलांनी आपल्या ह्सतकलेतून तयार केलेल्या तोरणांनाही अधिक पसंती मिळाली आहे.

मालमत्ताधारकांनो २५ मे पूर्वी करभरणा करा दंडात्मक कारवाई टाळा : मुंबई मनपा

■मुंबई, विशाल पाटील,

मुंबई महापालिकेने थकीत कोट्यवधी रुपयांची मालमत्ता कर थकबाकी भरण्यासाठी ३१ मार्चपर्यंत दिलेली मुदत वाढवून २५ मेपर्यंत केली आहे. मात्र या मुदतीपूर्वी मालमत्ता कर थकबाकी भरून दंडात्मक कारवाई टाळावी, असे आवाहन महापालिकेने मालमत्ता कर थकबाकीदार यांना केले आहे. मुंबई महापालिकेच्या उत्पन्नाचे एक प्रमुख स्त्रोत असलेल्या मालमत्ता कराची थकबाकी ३१ मार्चपर्यंत भरण्यासाठी मुदत दिली होती. मात्र या मुदतीपर्यंत शंभर टक्के मालमत्ता करधारकांनी आपला मालमत्ता कर भरलेला नव्हता. वास्तविक, महापालिकेने सरलेल्या आर्थिक वर्षात मालमत्ता करापोटी ६ हजार कोटी रुपयांची वसुली करण्याचे अंदाजित लक्ष्य ठरवले होते. मात्र नंतर ते लक्ष्य ४,५०० कोटी रुपये एवढे निश्चित करण्यात आले होते. मात्र पालिकेला सरलेल्या आर्थिक वर्षात ३,१९५ कोटी ९१ लाख ११ हजार रुपयांची कर वसुली करणे शक्य झाले आहे. मात्र दुसरीकडे मालमत्ता कर वसुलीत १,३०५ कोटी रुपये घट झाली आहे.त्यामुळे आता कर निर्धारण व संकलन खात्याने कोट्यवधी रुपयांची थकबाकी वसूल करण्यासाठी २५ मेपर्यंत मुदतवाढ दिली आहे. या मुदतीपूर्वी मालमत्ता करधारकांनी आपली कर थकबाकी त्वरित भरून दंडात्मक कारवाई मधून आपली सुटका करून घ्यावी, असे आवाहन पालिकेकडून करण्यात आले आहे. कर संकलन व कर आकारणी विभागाच्या वतीने कर वसूली करण्यासाठी विविध प्रकारचे प्रयत्न केले जात आहेत. विभागीय स्तरावर कार्यालयीन दिवशी तसेच सुट्टीच्या दिवशी करदात्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन करवसुलीचे कामकाज सुरु आहे. समाज माध्यमांद्वारे संपर्क करुन तसेच गृहनिर्माण संस्थेतील सदनिकानिहाय करवसुलीचे कामकाज कार्यरत आहे. मालमत्ताधारकांना करभरणा करण्यासाठी प्रोत्साहित करण्याच्या उद्देशाने मुंबई महापालिकेच्या वतीने विविध माध्यमांतून जनजागृती तसेच आवाहन करण्यात आले आहे. तथापि, अद्यापही करभरणा न केलेल्या मालमत्ताधारकांनी वेळीच कर जमा करुन दंडात्मक तसेच कायदेशीर कारवाई टाळावी, असे आवाहन महापालिकेकडून करण्यात आले आहे.

कर भरण्यासाठी ५ एप्रिलपर्यंत पाठपुरावा केलेल्या 'टॉप टेन' मालमत्ताधारकांची यादी

- ओम ओमेगा शेल्टर (जी/दक्षिण विभाग)- २० कोटी ४६ लाख ६९ हजार ५४५ रुपये
- शिवालिक व्हेंचर्स प्रा. लि (एच/पूर्व विभाग)- १२ कोटी २८ लाख ९८ हजार १६ रुपये
- गोल्डन टोबॅको (के/पश्चिम विभाग)- ११ कोटी ८४ लाख ८९ हजार ९८८ रुपये
- द वेस्टर्न इंडिया (जी/उत्तर विभाग)- ९ कोटी २१ लाख ४० हजार ४२५ रुपये
- समर्थ सिद्धार्थ शॉपिंग सेंटर (पी/दक्षिण विभाग)- ६ कोटी ३७ लाख ५० हजार ५ रुपये
- एम. बी. जुहूकर (के/पूर्व विभाग)- ५ कोटी ५२ लाख ३० हजार ५०५ रुपये
- सुनील कन्स्ट्रक्शन (आर/मध्य विभाग)- ३ कोटी ९ लाख ३३ हजार ६४४ रुपये
- द ट्रस्टी शरद एन (एम/पूर्व विभाग)- २ कोटी ३५ लाख ८४ हजार ४४० रुपये
- अतुल प्रोजेक्ट इंडिया प्रा. लि. (टी विभाग)- २ कोटी २२ लाख ५६ हजार ७२९ रुपये
- अजंता कर्मवीर कन्स्ट्रक्शन (पी/उत्तर विभाग)- २ कोटी ३ लाख १७ हजार ५४१ रुपये

शाळेच्या आरक्षणावरील बेकायदा इमारत जमीनदोस्त... मनपा आय प्रभागाची कारवाई

> "आय प्रभागात बेकायदा बांधकामांवर सतत करावाई सुरू असल्याने या भागातील बेकायदा बांधकामे उभारणीची कामे बंद आहेत."
>
> -हेमा मुंबरकर, साहाय्यक आयुक्त, आय प्रभाग, कल्याण पूर्व.

■ठाणे, रोहित जैसवाल :

कल्याण डोंबिवली पालिकेच्या शाळेच्या आरक्षित भूखंडावर कल्याण पूर्वेत आडिवली ढोकळी गावात स्थानिकांनी चार माळ्याची तीस सदनिका असलेली बेकायदा इमारत उभारली होती. याप्रकरणी तक्रारी प्राप्त होताच, आय प्रभागाच्या साहाय्यक आयुक्त हेमा मुंबरकर यांनी तोडकाम पथकाच्या साहाय्याने मागील पाच दिवसांच्या काळात आरक्षित भूखंडावरील बेकायदा इमारत भुईसपाट केली. कल्याण पूर्वेतील आय प्रभागात भुईसपाट करण्यात आलेली ही सातवी टोलेजंग बेकायदा इमारत आहे. या प्रभागात गेल्या वर्षभराच्या कालावधीत शंभरहून अधिक चाळी, व्यापारी गाळे साहाय्यक आयुक्त मुंबरकर यांनी राजकीय दबाव झुगारून, भूमाफियांच्या विरोधाला न जुमानता तोडून टाकले आहेत. कल्याण पूवेर्तील आय प्रभागात आडिवली ढोकळी गावात पालिकेचे शाळेचे आरक्षण असलेल्या भूखंडावर भूमाफियांनी चार माळ्याची बेकायदा इमारत बांधून पूर्ण केली होती. आयक्त डॉ. इंदुराणी जाखड यांनी पालिकेच्या आरक्षित भूखंडावरील रहिवास नसलेल्या बेकायदा इमारती तोडून टाकण्याच्या सूचना साहाय्यक आयुक्तांना केल्या आहेत. आडिवली ढोकळीत शाळेच्या आरक्षित भूखंडावर बेकायदा इमारत उभारल्याच्या तक्रारी आय प्रभागात दाखल झाल्या होत्या. या तक्रारींची दखल घेऊन साहाय्यक आयुक्त मुंबरकर यांनी नगररचना विभागाकडून या भूखंडासंदर्भात माहिती मागवली. त्यावेळी संबंधित भूखंड पालिकेच्या ताब्यातील आणि त्याच्यावर शाळेचे आरक्षण असल्याचे स्पष्ट झाले. पालिकेचा आरक्षित भूखंड हडप केल्याने मुंबरकर यांनी इमारत तोडण्याची विहित प्रक्रिया पार पाडून आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड, अतिक्रमणचे नियंत्रण विभागाचे उपायुक्त अवधूत तावडे यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या आठवड्यापासून ही बेकायदा इमारत तोडकाम पथक, जेसीबाच्या साह्याने पोलीस बंदोबस्तात तोडण्यास सुरूवात केली होती. मागील चार दिवसाच्या कालावधीत इमारतीचे सज्जे, गच्ची तोडून झाल्यानंतर या इमारतीच्या चारही बाजुला जेसीबीच्या साहाय्याने छिद्र पाडून ही इमारत पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे भुईसपाट करण्यात आली.आडिवलीतील शाळेच्या आरक्षणावरील बेकायदा इमारत जमीनदोस्त करण्यात आल्याने परिसरातील सोसायट्यांमधील रहिवाशांनी समाधान व्यक्त केले आहे.

मिरारोड येथे कामगारांच्या झोपड्यांमध्ये, चार सिलेंडरचा स्फोट

सुदैवाने कोणतीही जीवितहानी नाही

■मिरारोड, भावना जैन :

कामगारांसाठी बांधण्यात आलेल्या झोपड्यांना भीषण आग लागल्याची घटना सोमवारी दुपारी बाराच्या सुमारास घडली आहे. या आगीमुळे चार सिलेंडरचा स्फोट घडला. अग्निशमन दलाने या आगीवर नियंत्रण मिळून आग आटोक्यात आणली आहे. सुदैवाने कोणत्याही प्रकारची जीवितहानी झाली नाही. मिरारोड येथील रामदेव भागात सलासार गृहनिर्माण संस्थेच्या नवीन प्रकल्पाचे काम सुरू आहे. त्यामुळे या प्रकल्प स्थळीच कामगार झोपड्या

उभारून राहत आहेत. दरम्यान सोमवारी दुपारी बाराच्या सुमारास यातील एका झोपडीमध्ये आग लागल्याची घटना घडली. यात झोपडीमधील सिलेंडरचा स्फोट झाला. यामुळे आगीची तीव्रता अधिक वाढून आजूबाजूच्या तीन झोपड्यांना आग लागली यामुळे एका मागोमाग एक असे सलग सिलेंडरचे तीन स्फोट झाले. या आगीत प्रकल्प स्थळी असलेले प्लास्टिक देखील जळले. त्यामुळे उंच उंच आगीचे व काळ्या धुराचे लोळ हवेत पसरले. याबाबत कामगारांनी महापालिकेच्या अग्निशमन विभागाला माहिती दिली होती. त्यानुसार घटना स्थळी पोहोचून आगीवर नियंत्रण मिळविले. या आगीत कोणत्याही प्रकारची जीवितहानी झालेली नसून पाच मोठ्या गाड्यांच्या मदतीने आगीवर नियंत्रण मिळवले असल्याची माहिती अग्निशमन अधिकारी प्रकाश बोराडे यांनी दिली आहे. मात्र आग नेमकी कोणत्या कारणामुळे लागली याचे कारण समजू शकले नाही.

//सुविचार

'योग्य वेळेची वाट पाहणे थांबवा
कारण योग्य वेळ कधीच येत नाही!!!'

ग्लुटेनची ॲलर्जी कशी ओळखाल?

आजकालच्या आहारपद्धतीमध्ये 'ग्लुटेन फ्री' डायट लोकप्रिय होत आहे. वजन कमी करण्यासाठी ग्लुटेन फ्री पदार्थांचे सेवन करण्याच्या प्रमाणात वाढ होत आहे. पण काही व्यक्ती अशा आहेत, ज्यांना मुळातच ग्लुटेनची ॲलर्जी असते. पण ही ॲलर्जी नेमकी कशामुळे होत आहे, हे लक्षात न आल्यामुळे आहारातील पथ्ये पाळणे अवघड होत असते. जर एखाद्याला ग्लुटेनची ॲलर्जी होत असेल, तर काही लक्षणांवरून ही ॲलर्जी समजून येऊ शकते. ग्लुटेनयुक्त पदार्थ खाल्ल्याने उलट्या होणे, पोटदुखी उद्भवणे, डायरिया यांसारख्या तक्रारी उद्भवू लागतात. या तक्रारींकडे वेळीच लक्ष पुरवून डॉक्टरांकडून निदान करावे. ग्लुटेनची ॲलर्जी असल्यास ही लक्षणे दिसून येतात -

जर ग्लुटेनयुक्त पदार्थ खाल्ल्याने पोटदुखी उद्भवत असेल, तर ही ग्लुटेनची ॲलर्जी असू शकते. पोटदुखीच्या जोडीने गॅसेस, पोट फुगणे, बद्धकोष्ठता आणि डायरिया या तक्रारी देखील उद्भवू शकतात. या ॲलर्जीमुळे लहान आतड्याच्या अस्तराला हानी पोहोचू शकते. ग्लुटेनच्या ॲलर्जीमुळे आहारातील क्षार, जीवनसत्त्वे शरीरामध्ये शोषली जाऊ शकत नाहीत. तसेच ग्लुटेनयुक्त पदार्थांचे सेवन केल्याने अचानक चक्कर येणे, तोल सांभाळता न येणे अशी लक्षणे दिसू लागली तर ही ग्लुटेनची ॲलर्जी असू शकते.

ग्लुटेनयुक्त पदार्थ खाल्ल्यानंतर सुमारे तासाभराने डोकेदुखी किंवा मळमळ सुरू होणे ग्लुटेनची ॲलर्जी असल्याचे लक्षण असू शकते. तसेच अचानक उद्भवणारे 'मूड स्विंग', म्हणजेच मनस्थिती सतत बदलत राहणे, हे देखील ग्लुटेनच्या ॲलर्जीचे लक्षण आहे. एखादा ग्लुटेन युक्त पदार्थ खाल्ल्यानंतर अंग खाजणे, किंवा अंगावर बारीक पुरळ उठणे, हेही ॲलर्जीचे लक्षण आहे.

ग्लुटेनयुक्त पदार्थ खाल्ल्याने ही लक्षणे उद्भवताना आढळली, तर त्वरित डॉक्टरांचा सल्ला घेऊन योग्य निदान करून घ्यावे. तसेच आपल्या आहारामध्ये ग्लुटेन फ्री अन्नपदार्थांचा समावेश करावा.

पांढरे कपडे धुण्याची डोकेदुखी आता विसरा

पांढरे कपडे प्रत्येकाला घालायला आवडतात. कारण पांढरे कपडे घातल्यावर तुमचा लूकच बदलतो, मग ते ऑफिसला जाताना कडक इस्त्रीचा पांढरा शर्ट असो, वा तुमच्या मुलाचा युनिफॉर्म किंवा तुमचा आवडता पांढरा कुर्ता. पण प्रश्न असतो ते घातल्यावर जपायचा. कारण ज्या दिवशी आपण पांढरे कपडे घालतो, तेव्हा नेमका त्यावर डाग पडतो. मग आठवतो, तो आईचा ओरडा. पण लग्न झाले असेल तर डाग लागलेले पांढरे कपडे स्वतःच धुवायला लागतात. मोठीच समस्या असते नाही का? एवढेच नाहीतर कधी कधी पांढरे कपडे धुतल्यावर निस्तेजही वाटू लागतात. पण आता नो प्रोब्लेम. तुमच्यासाठी काही टिप्स; ज्या वापरून तुम्ही पांढरे कपडे धुतल्यास ते राहतील पांढरे शुभ्र. पांढरे कपडे नेहमी इतर कपड्यांपेक्षा वेगळे ठेवा. पांढऱ्या कपड्यांना लगेच दुसरा रंग लागतो. त्यामुळे ते इतर कपड्यांपासून वेगळेच ठेवावेत. कपडे धुवायला घेतल्यावर पांढरे कपडे प्रथम धुवावेत. नंतर इतर रंगाचे कपडे धुवावेत.

ओव्हरलोडिंग टाळा : कोणत्याही वॉशिंग मशीनमध्ये क्षमतेपेक्षा जास्त कपडे धुवायला टाकू नका. असं केल्याने मशीनमध्ये कपडे व्यवस्थित धुतले जात नाहीत. ज्यामुळे कपड्यातील घाण तशीच राहते. पांढरे कपडे धुताना या गोष्टींची काळजी आवर्जून घ्या.

कोमट पाण्याचा वापर : पांढऱ्या रंगाचे कपडे कधीही कोमट पाण्याने धुतल्यास जास्त स्वच्छ निघतात. अशा पाण्याने कपडे धुतल्याने तेलाचे डाग किंवा कपड्यांची दुर्गंधी लगेच दूर होते.

व्हिनेगरचा वापर : पांढरे कपडे धुतल्यानंतर ते व्हिनेगर घातलेल्या पाण्यात भिजवून ठेवल्यासही त्यांची दुर्गंधी नाहीशी होते.

बेकिंग सोडा आणि लिंबू : पांढरे कपडे धुताना तुम्ही बेकिंग सोडा आणि लिंबाचा वापरही करू शकता. पांढराशुभ्र रंग कायम राहण्यासाठी पांढरे कपडे धुण्याआधी ते लिंबाचा रस घातलेल्या पाण्यात भिजवा आणि मग धुवा. तसंच तुम्ही व्हिनेगर आणि बेकिंग सोडा घातलेल्या पाण्याने पांढरे कपडे धुतल्यासही ते पांढरेशुभ्र निघतील.

कपडे तपासा : तुम्ही जर पांढरे कपडे वॉशिंग मशीनमध्ये धुवायला टाकले असतील तर ड्रायरमध्ये सुकवण्याआधी ते एकदा तपासा. जर कपड्यांमध्ये कुठे डाग दिसल्यास ते पुन्हा धुवा. जर डागासकट तसेच कपडे धुतल्यास त्यवरील डाग कायम राहील.

डिटर्जंट : पांढरे कपडे धुण्यासाठी नेहमी योग्य डिटर्जंट पावडर निवडा. याशिवाय कपडे धुताना त्यात योग्य प्रमाणात डिटर्जंट घालणंही आवश्यक आहे. जास्त प्रमाणात डिटर्जंट घातल्यासही कपड्यांवर डाग पडू शकतात. तसंच कपडे निस्तेजही दिसू शकतात. अशाप्रकारे तुम्ही तुमच्या पांढऱ्या कपड्यांची काळजी घेतल्यास त्यावर कधीच डाग पडणार नाहीत आणि ते स्वच्छ पांढरेशुभ्र दिसतील.

दुधाबरोबर मध घेण्याचे फायदे जाणून घेऊया

आपल्याला हे माहीतच आहे की, नियमित दूध पिणं आरोग्यासाठी फायदेशीर आहे; परंतु जर आपण दुधात मध घातले तर त्याचा फायदा दुपटीने होतो. असे केल्यास आरोग्यविषयक समस्यांपासून आपण मुक्त होऊ शकतो.

- दररोज एक कप दुधात मध घालून प्यायल्याने शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी फायदेशीर असते. हे दोन्ही प्रकारच्या क्षमता वाढवण्यास उपयुक्त आहे.
- अनिद्रेची समस्या असल्यास रात्री कोमट दुधात मध टाकून प्या, असे केल्यास अनिद्रेची समस्या नाहीशी होते आणि त्वरित आराम मिळतो.
- पचन सुधारण्यासाठी दुधात मध घालून पिण्याने बद्धकोष्ठतेच्या त्रासापासून सुटका होते.
- दुधात प्रथिने आणि कॅल्शियम भरपूर प्रमाणात असतात आणि मध रोग प्रतिकारक शक्ती वाढवण्यास सक्षम असतं. यांना एकत्र करून प्यायल्याने उत्तम आरोग्य पर्याय असल्याचे सिद्ध करतात.
- ताणतणाव दूर करण्याचे हे एक उत्तम साधन आहे. कोमट दुधात मध घालून प्यायल्याने प्रजनन क्षमता आणि शुक्राणूंची संख्या वाढविण्यास मदत होते.

थंड वाऱ्यामुळे लोक आजारांना सहज बळी पडतात. या ऋतूत थंडी टाळण्यासाठी फक्त उबदार कपडे घालणे पुरेसे नाही, शरीर आतून उबदार ठेवण्यासाठी आहाराकडेही विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. हिवाळ्यात अनेक प्रकारच्या पालेभाज्या मिळतात, ज्यामध्ये भरपूर पोषक तत्त्वे असतात. याच्या सेवनाने तुम्ही अनेक आजारांपासून दूर राहू शकता. या ऋतूमध्ये तुम्ही या भाज्यांचे नियमित सेवन केल्यास तुमची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते, ज्यामुळे तुम्ही अनेक प्रकारच्या संसर्गापासून दूर राहू शकता. चला जाणून घेऊया, रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी कोणत्या भाज्यांचे सेवन केले जाऊ शकते.

हिवाळ्यात या ४ भाज्या नक्की खाव्यात, आजारांपासून दूर राहाल

मेथी : हिवाळ्यात मेथीची हिरवी पाने मुबलक प्रमाणात उपलब्ध असतात. तुम्ही त्याचा आहारात अनेक प्रकारे समावेश करू शकता. ही पाने आरोग्यासाठीही खूप फायदेशीर आहेत. मेथीच्या पानांमध्ये अँटीऑक्सिडंट गुणधर्म भरपूर असतात. या पानांमध्ये व्हिटॅमिन-ए, व्हिटॅमिन-ई, फायबर आणि अनेक पोषक तत्त्वे आढळतात, ज्यामुळे तुमचे शरीर निरोगी राहण्यास मदत होते.

पालक : पालक हा पोषक तत्त्वांचा खजिना आहे, हिवाळ्यात पालकाचे सेवन केल्याने तुम्ही आरोग्याशी संबंधित अनेक समस्या टाळू शकता. त्यात लोह, पोटॅशियम, व्हिटॅमिन के, व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन सी आणि इतर पोषक घटक आढळतात, जे अनेक रोग बरे करण्यास मदत करतात. यामध्ये असलेले व्हिटॅमिन सी रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी उपयुक्त आहे. याच्या मदतीने तुम्ही व्हायरस आणि बॅक्टेरियापासून दूर राहू शकता.

मुळा : हिवाळ्यात मुळा खाल्ल्याने अनेक आरोग्यदायी फायदे होतात. तुम्ही त्याचा आहारात अनेक प्रकारे समावेश करू शकता. या मोसमात तुम्ही मुळा पराठे बनवू शकता. तुम्हाला हवे असल्यास तुम्ही भाजी किंवा कोशिंबीर म्हणूनही खाऊ शकता. तज्ज्ञांच्या मते मुळ्यामध्ये असलेले व्हिटॅमिन सी, फॉलिक, अँथोसायनिन अनेक धोकादायक आजारांपासून संरक्षण करण्यास मदत करतात.

गाजर : लोकांना हिवाळ्यात गाजर खायला आवडते. हे आरोग्यासाठी खूप फायदेशीर मानले जाते. यामध्ये लोह, पोटॅशियम, तांबे, मँगनीज इत्यादी अनेक पोषक घटक आढळतात, जे अनेक आजारांपासून संरक्षण करतात. गाजरातील जीवनसत्त्वे रोगप्रतिकारक शक्ती मजबूत ठेवण्यास मदत करतात. याशिवाय डोळ्यांचे आरोग्य चांगलेही राहते.

आहारातील साखर कमी करा, त्याऐवजी नैसर्गिक स्वीटनर्स वापरा

आपल्या आहारातून साखर वर्ज्य करणे हा पर्याय केवळ मधुमेह असणाऱ्या, किंवा वजन कमी करू इच्छिणाऱ्या व्यक्तींसाठीच आवश्यक नाही, तर अगदी तंदुरुस्त व्यक्तींकरिता देखील हे आवश्यक आहे. आपण नेहमी खातो ती पांढरी रिफाइंड साखर आरोग्यास हितकारक नाही, त्यामुळे तिचे सेवन शक्यतितक्या कमी प्रमाणात करायला हवे. साखरेऐवजी वापरता येण्यासारखे कृत्रिम स्वीटनर्सदेखील बाजारामध्ये उपलब्ध आहेत. पण यांच्यामध्ये असलेले ॲस्पारटेमसारखे घटक शरीराला नुकसानकारक ठरू शकतात. अशा वेळी संपूर्णपणे प्राकृतिक स्वीटनर्सचा उपयोग करण्याचा विचार करता येईल.

उसाचा रस निसर्गाने मानवाला दिलेले सुपर फ्लुइड म्हणता येईल. तसेच उसाचा रस घातल्याने पदार्थाला आलेला गोडवा वेगळाच, पण चविष्ट असतो. उत्तम एनर्जी ड्रिंक, स्कीन टोनर, शरीरातील घातक द्रव्ये बाहेर टाकण्यास मदत करणारा असा हा उसाचा रस अनेक औषधी गुणांनी युक्त आहे. पण याचा समावेश आपण आपल्या आहारामध्ये फारसा केलेला नाही. घराबाहेर पडल्यावर उसाच्या रसाचे गुऱ्हाळ दिसले आणि रस पिण्याची इच्छा झाली तरच आपण रस पिण्याचा विचार करत असतो. पण असे न करता उसाच्या रसाचा आपल्या आहारामध्ये नियमितपणे समावेश करा. आजकाल उसाचा हंगाम नसला तरी बाटल्यांमध्ये बंद उसाचा रस, किंवा कोल्ड प्रेस्ड उसाचा रस बाजारामध्ये सहज उपलब्ध आहे.

मध हा पदार्थ साखरेला उत्तम पर्याय ठरू शकतो. मध हे नैसर्गिक अँटी बायोटिक आहे. आपल्याकडे अनेक घरगुती औषधोपचारांसाठी मध वापरण्याची परंपरा फार पूर्वीपासून चालत आली आहे. यामध्ये प्रथिने, क्षार आणि जीवनसत्त्वे देखील आहेत. कच्चे मध पचनशक्ती चांगली बनवण्यास मदत करते. यामध्ये अँटी ऑक्सिडंट्स मोठ्या प्रमाणात असल्याने याच्या सेवनाने शरीर डीटॉक्सिफाय होते. एक चमचा मधामध्ये केवळ वीस कॅलरीज असल्याने वजन घटवण्यासाठी हा उत्तम पर्याय आहे. कोकोनट पाम शुगर हा देखील रिफाइंड साखरेला पर्याय आहे. यामध्ये लोह, झिंक, कॅल्शियम आणि पोटॅशियम मोठ्या प्रमाणात आहे. तसेच यामध्ये पॉलीफेनॉल्स आणि अँटी ऑक्सिडंट्स देखील मोठ्या प्रमाणावर आहेत. त्याचप्रमाणे सध्या स्टेविया नामक नैसर्गिक, झाडांपासून काढले जाणारे स्वीटनर बाजारामध्ये मिळत आहे, व लोकप्रिय देखील होत आहे. स्टेविया अनेक फ्लेवर्समध्ये उपलब्ध असून, इतर कृत्रिम स्वीटनर्समध्ये असणारे ॲस्पारटेम यामध्ये नाही. याच्या सेवनाने ब्लड शुगर किंवा इन्स्युलीन लेव्हल्स वर कोणत्याही प्रकारचा फरक पडत नाही.

प्रवीण तरडेंसह 'धर्मवीर' चित्रपटाच्या निर्मात्यांनी घेतली राज ठाकरेंची भेट, फोटो शेअर करत म्हणाले...

'धर्मवीर... मुक्काम पोस्ट ठाणे' हा चित्रपट १३ मे २०२२ रोजी प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. बॉक्स ऑफिसवर या चित्रपटाने जबरदस्त कमाई केली होती. 'धर्मवीर'मधून शिवसेनेचे दिवंगत ठाणे जिल्हाप्रमुख आनंद दिघे यांचा जीवनप्रवास दाखवण्यात आला होता. या चित्रपटात आनंद दिघे यांची भूमिका अभिनेता प्रसाद ओकने साकारली आहे. आता लवकरच 'धर्मवीर'चा दुसरा भाग प्रदर्शित होणार असून, काही दिवसांपूर्वीच राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते ठाण्यात 'धर्मवीर २' या चित्रपटाचा मुहूर्त संपन्न झाला. या मुहूर्तालाचित्रपटाचे निर्माते, दिग्दर्शक, कलाकार तसेच राजकीय नेते उपस्थित होते. या चित्रपटाचं दिग्दर्शन प्रवीण तरडे यांनी केलं असून, निर्मिती मंगेश देसाईंनी केली आहे. नुकतीच या दोघांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची भेट घेतली. प्रवीण तरडेंसह 'धर्मवीर' चित्रपटाचे निमार्ते मंगेश देसाई राज ठाकरेंच्या भेटीला पोहोचले होते. यावेळी महेश लिमये देखील उपस्थित होतील. सध्या यांच्या भेटीचा फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. ''राज साहेब, महेश लिमये, प्रवीण तरडे आणि मी...मस्त गप्पा'' असं कॅप्शन देत मंगेश देसाईंनी हा फोटो शेअर केला आहे. दरम्यान, धर्मवीर २ मध्ये प्रसाद ओकशिवाय कोणकोणते कलाकार झळकणार हे अद्याप गुलदस्त्यात आहे. 'धर्मवीर २' चित्रपटाच्या पोस्टरवर भगव्या रंगात 'धर्मवीर २' आणि ''साहेबांच्या हिंदुत्त्वाची गोष्ट...'' अशी टॅगलाईन नमूद करण्यात आली आहे. त्यामुळे हा चित्रपट हिंदुत्त्वावर भाष्य करणारा असल्याचा प्राथमिक अंदाज बांधण्यात येत आहे. आता चित्रपट प्रदर्शित केव्हा होणार याची चाहत्यांना उत्सुकता आहे.

दै. लोकरक्षणाय सुडोकू - ५१

4	7	3			8			1
6		1	7	9	2			
				1		8		
	9				7	6	3	
2			4					
5		7			6			
	5		2	4			8	
1		2					7	
3			5		1		9	

उत्तर सुडोकू -५०

7	9	3	8	1	4	6	2	5
1	2	6	7	5	9	3	8	4
4	5	8	3	6	2	7	9	1
5	3	9	1	7	6	8	4	2
8	7	4	5	2	3	9	1	6
2	6	1	9	4	8	5	3	7
6	8	7	2	9	1	4	5	3
9	1	5	4	3	7	2	6	8
3	4	2	6	8	5	1	7	9

एक ते नऊ आकडे आडव्या व उभ्या सरळ रेषेत अशा प्रकारे भरायचे की एका रेषेत एक आकडा एकदाच आला पाहिजे. प्रत्येक सरळ रेषेत आणि ३ बाय ३ च्या प्रत्येक लहान चौकात सर्व एक ते नऊ आकडे आलेच पाहिजेत. आधीच्या छापील आकड्यांची अजिबात हलवाहलव करायची नाही. प्रत्येक कोड्याला एकच उत्तर आहे.

चैत्र हा हिंदूच्या कालगणनेनुसार वर्षातला पहिला महिना आणि या महिन्यापासून वसंत- ऋतूलाही सुरूवात होते. त्यामुळे सारी सृष्टी आनंदित होते.वसंत ऋतू आपले सारे वैभव अगदी मुक्त हस्ताने सृष्टीवर उधळीत असतो, अशा प्रसन्न, आल्हाददायक वातवरणात आपल्या नव वषार्ची सुरूवात होते. घरांवर गुढ्या उभारून तोरणे लावून आपण उत्साहात नवीन वषार्चे स्वागत करतो. वर्षाच्या या पहिल्या सणाला ह्यगुढीपाडवाह्न किंवा ह्यवर्षप्रतिपदाह्न असे म्हणतात.

गुढीपाडवा शुभमुहुर्त

यंदा गुढीपाडवा ९ एप्रिल २०२४ (मंगळवार) रोजी साजरा करण्यात येणार आहे. चैत्र महिन्याची प्रतिपदा ८ एप्रिलला (सोमवारी) रात्री ११ वाजून ५० मिनिटांनी सुरू होणार असूनन दुसऱ्या दिवशी ९ एप्रिलला रात्री ८ वाजून ३० मिनिटांनी समाप्त होणार आहे. मंगळवारी ९ तारखेला सकाळी ६ वाजून २० मिनिटांनी ते ७ वाजून २९ मिनिटांपर्यंत पुजेची शुभ वेळ आहे. यामध्ये सकाळी ६ वाजून २० मिनिटे ते ६ वाजून २७ मिनिटे हा सर्वोत्तम कालावधी आहे असे पंचागानुसार सांगितलेले आहे. या शुभ मुहुर्तावर गुढीची पुजा करून तुम्ही गुढी उभारू शकता. घरोघरी गुढी उभारून पुरळणपोळी, श्रीखंड पुरी, आमरस पुरी असा नैवेद्य दाखवला जाईल. उत्तम आरोग्यासाठी गुढीपाडव्याच्या दिवशी कडुलिंबाची चटणी ज्याला काही ठिकाणी कडुलिंबाचे चुर्ण असे म्हणतात ते खाण्याची ही परंपरा आहे.

गुढी कशी उभारावी?

गृहिणी अंगण झाडून स्वच्छ करतात, त्यावर सडा शिंपतात व सुंदर रांगोळी काढतात. त्यावर नववर्षाच्या स्वागताला गुढी उभारली जाते. बांबूची उंच काठी रंगीत खणाने किंवा वस्त्राने शृंगारतात. त्यावर चांदीचे किंवा तांब्या-पितळेचे पात्र ठेवले जाते. त्या तांब्याच्या कलशावर स्वस्तिक असावे. त्यानंतर हार, गाठी, कडुलिंबाची डहाळी त्याला लावली जाते. अशा तयार केलेल्या गुढीची पूजा करतात आणि ती अंगणात उभारतात. गुढी उभारताना तीन गोष्टी लक्षात ठेवा. सुर्योदयानंतर लगेचच उभारावी. जमीनीवर पाट ठेवून गुढी थोडी कललेल्या स्थितीत उभारावी. तांब्याच्या कलशावर स्वस्तिक काढून तो गुढीवर उपडा ठेवावा.

गुढीपाडवा साजरा करण्याचा उद्देश

शास्त्रात असे म्हटले आहे की होळीच्या काळात भेदभाव टाकून स्वीकारलेली समता फार काळ टिकू शकत नाही. त्यामुळे अव्यवस्था निर्माण होते. ही अव्यवस्था संपवून पुन्हा व्यवस्था निर्माण करण्यास आरंभ करण्याचा दिवस म्हणजे चैत्र शुद्ध प्रतिपदा. या दिवसापासून पुन्हा नव्याने सुरूवात करून आपापली कर्तव्यकर्मे करायला आरंभ करायचा. अंगणात किंवा खिडकीत उभारलेली ती गुढी जणू काही सांगत असते, नवीन वर्ष सुरू झालंय. नवा विचार करा. सद्विचार, सदाचार यांची झेप आकाशाला गवसणी घालू द्या. सदैव तुमची प्रगती होवू दे.

दिनविशेष

९ एप्रिल

- १८६७: रशियाकडून अलास्का हा प्रांत खरेदी करण्याच्या प्रस्तावास अमेरिकेत एक मताने मंजुरी मिळाली.
- १९४०: दुसरे महायुद्ध झ जर्मनीने नॉर्वे व डेन्मार्क पादाक्रांत केले.
- १९६७: बोइंग-७६७ या विमानाने पहिले उड्डाण केले.
- १९९४: सूक्ष्मजीवशास्त्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल शास्त्रज्ञ पी. एम. भार्गव यांना आर. डी. बिर्ला राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला.
- १९९५: लता मंगेशकर यांना अवधरत्न आणि साहू सूरसन्मान प्रदान करण्यात आले.
- १३३६: मंगोल सरदार तैमूरलंग यांचा जन्म. (मृत्यू: १८ फेब्रुवारी १४०५)
- १७७०: जर्मन भौतिकशास्त्रज्ञ थॉमस योहान सीबेक यांचा जन्म.
- १८२८: थोर समाजसुधारक गणेश वासुदेव जोशी उर्फ सार्वजनिक काका यांचा जन्म. (मृत्यू: २५ जुलै १८८०)
- १८८७: पुणे विद्यार्थी गृहाचे एक संस्थापक विष्णू गंगाधर तथा दादासाहेब केतकर यांचा जन्म. (मृत्यू: १९ ऑक्टोबर १९५०)
- १८९३: बौद्धधमार्चे भाष्यकार आणि इतिहासकार राहुल सांकृत्यायन यांचा जन्म. (मृत्यू: १४ एप्रिल १९६३)
- १९२५: अमेरिकन ज्योतिषी व लेखिका लिंडा गुडमन यांचा जन्म. (मृत्यू: २१ ऑक्टोबर १९९५)
- १९३०: अमेरिकन रसायनशास्त्रज्ञ एफ. अल्बर्ट कॉटन यांचा जन्म.
- १९४८: हिंदी चित्रपट अभिनेत्री जया भादुरी यांचा जन्म.
- ५८५: ५८५ इ.स. पूर्व : जपानचा पहिला सम्राट सम्राट जिम्मू यांचे निधन. (जन्मः १३ फेब्रुवारी इ. स. पूर्व ७११)
- १६२६: इंग्लिश तत्त्ववेत्ते व मुत्सद्दी सर फ्रॅन्सिस बेकन यांचे निधन. (जन्मः २२ जानेवारी १५६१)
- १६९५: पंडितकवी वामनपंडित यांनी भोगाव येथे समाधी घेतली.
- १९९४: स्वातंत्र्यसैनिक, तेलंगणच्या लढ्याचे प्रवर्तक तसेच भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस चंद्र राजेश्वर राव यांचे निधन.
- १९९८: महानुभाव पंथाचे अभ्यासक, विचारवंत व तत्त्वज्ञ, नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विष्णू भिकाजी तथा वि. भि. कोलते यांचे निधन. (जन्मः २२ जून १९०८)
- २००१: पत्रकार आणि स्तंभलेखक बेहराम कॉंट्रॅक्टर ऊर्फ बिझी बी यांचे निधन. (जन्मः ११ ऑक्टोबर १९३०)
- २००१: दलित साहित्यिक तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू शंकरराव खरात यांचे निधन. (जन्मः ११ जुलै १९२१)
- २००९: हिंदी व बंगाली चित्रपट दिग्दर्शक निमार्ते शक्ती सामंत यांचे निधन. (जन्मः १३ जानेवारी १९२६)
- २००९: लोककलांचे अभ्यासक आणि गीतकार अशोकजी परांजपे यांचे निधन.

भविष्य

मेष हितशत्रूंना आवर बसेल. भरणी नक्षत्राच्या व्यक्तींना राजकीय लाभ घडतील. कृत्तिका नक्षत्राच्या व्यक्तींना शनिवार खरेदीत फसण्याचा.

वृषभ कृत्तिका नक्षत्राच्या व्यक्तींना सप्ताहारंभ नोकरीत हितशत्रू पीडेचा. १४ व १५ हे दिवस मृग नक्षत्राच्या व्यक्तींना शनिवार प्रवास.

मिथुन सप्ताह काहींना विशिष्ट वेदनेतून हैराण करणारा. बाकी सप्ताहाची सुरुवात पुनर्वसु नक्षत्राच्या व्यक्तींना वैयक्तिक उपक्रमांतून छानच.

कर्क अतिशय संमिश्र ग्रहमान राहील. पुनर्वसु नक्षत्राच्या व्यक्तींना शुक्राच्या राश्यांतराचा पुष्य नक्षत्राच्या व्यक्तींना ता. १५ हे दिवस मोठे गतिमान राहतील.

सिंह यंत्रं, वाहनं आणि कामगार या त्रिघटकांतून उपद्रव निर्माण करणारा सप्ताह. मघा नक्षत्राच्या व्यक्तींनी अपवादात्मक उद्भवू पाहणाऱ्या परिस्थितीचं भान ठेवावं.

कन्या बाकी सप्ताह स्वतंत्र व्यावसायिकांना चांगला प्रतिसाद देईल. हस्त नक्षत्राच्या व्यक्तींचे मोठे व्यावसायिक करारमदार होतील. व्यावसायिक भांडवल पुरवठा होईल. पुत्रचिंता जाईल.

तुला प्रेम संबंधांमध्ये अधिक जवळीक निर्माण होईल. जर तुम्हाला काही मिळवायचे असेल तर आजचा दिवस उत्तम आहे. राजकारणी लोकांच्या संपकार्मुळे तुम्हाला चांगला फायदा होऊ शकतो.

वृश्चिक फक्त आजची संध्याकाळ आणि शनिवारची संध्याकाळ वातार्लापातून सांभाळावी. प्रेमिकांनी जपून. घरात कोणाचं लग्न ठरवाल. ज्येष्ठा नक्षत्राची व्यक्ती सप्ताहात चैनीवर खर्च करेल.

धनु उत्तराषाढा नक्षत्राच्या व्यक्ती मॅन ऑफ दि मॅच होतील. मूळ नक्षत्राच्या व्यक्तींना ता. १५ हे दिवस मोठे गतिमानच राहतील. राजकीय व्यक्तींकडून लाभ. मात्र शनिवारी वेंधळेपणा टाळा.

मकर आज पार्टनर सोबत बोलताना सतर्क राहा. आज तुमची तुमच्या व्यक्तीकडे एखाद्या गोष्टीबद्दल राग व्यक्त कराल. लहान व्यावसायिकांना आज एखाद्या त्रासाला सामोरे जावे लागेल.

कुंभ शनिभ्रमणाच्या पार्श्वभूमीवर हेच सांगत आहे. बाकी ता. १४ च्या वसंत पंचमीची संध्याकाळ गाठीभेटींतून हृद्य राहील. धनिष्ठा नक्षत्राच्या व्यक्तींना धनलाभ. तरुणांचं नैराश्य जाईल. प्रेमप्रकरणातून गती मिळेल.

मीन अर्थातच जीवनात उत्तम सीक्वेन्स लागतील. उत्तराषाढा नक्षत्राच्या व्यक्तींनी सप्ताहात हट्टीपणा टाळावा. धनिष्ठा नक्षत्राच्या व्यक्तींनी सप्ताहात थट्टामस्करी टाळावी. उत्तरा-भाद्रपदा नक्षत्राच्या व्यक्तींनी सप्ताहात चुकीच्या मित्रांची संगत टाळावी.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore. RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118. Office contact no. 97023 86118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

संपादकीय

कायदेनिर्मितीची प्रक्रिया

राज्यघटना या देशातील सर्वोच्च कायदा आहे. इतर सर्व कायद्यांची निर्मिती करण्याचा अधिकार भारतीय राज्यघटनेने देशाच्या संसदेला आणि राज्यांच्या विधिमंडळांना दिलेला आहे. मात्र त्याआधी भारतीय राज्यघटनेने कोणत्या विषयावर कोणाला कायदा करता येईल, यासाठी राज्यघटनेच्या सातव्या परिशिष्टात तीन सूची तयार केल्या असून, केंद्रीय सूची, राज्य सूची व समवर्ती सूची असे त्यांना संबोधले जाते. केंद्रीय सूचीतील विषयावर देशाच्या संसदेला कायदा करता येतो, तर राज्य सूचीतील विषयावर राज्याला कायदा करता येतो. मात्र समवर्ती सूचीतील विषयावर केंद्र व राज्य दोन्ही कायदे करू शकतात. अर्थात, अशा परिस्थितीत केंद्राचा कायदा प्रभावी ठरतो. राज्यसूचीतील विषयावर केंद्राला कायदा करावयाचा असल्यास राज्यसभेची पूर्वसंमती आवश्यक असते. ढोबळमानाने कायद्याचे दोन प्रकार करता येतात, सरकारी विधेयक आणि खासगी विधेयक. सरकारच्या वतीने जे विधेयक मांडले जाते त्याला सरकारी विधेयक असे म्हणतात, तर सरकारव्यतिरिक्त संसद अथवा विधिमंडळाच्या कोणत्याही सदस्यांकडून जेव्हा विधेयक मांडले जाते अशा विधेयकास 'खासगी विधेयक' असे संबोधले जाते. कोणत्याही सरकारी विधेयकाचा प्रवास सर्वप्रथम ते ज्या मंत्रालयाशी संबंधित आहे तेथून सुरू होतो. त्याचा मसुदा मंत्रालयाने तयार केल्यानंतर त्याला मंत्रिमंडळाची मान्यता घेऊन ते संसदेच्या कोणत्याही एका सभागृहात सादर केले जाते. त्याचे तीनदा वाचन होते, असे म्हणता येईल. पहिल्यांदा विधेयकाचे नाव व उद्देश वाचून ते सभागृहाच्या पटलावर ठेवतात. दुसऱ्या वेळी त्याच्यातील तरतुदींवर चर्चा होऊन सभागृहातील सदस्यांच्या समितीकडे पाठवले जाते. त्यानंतर समितीमध्ये विधेयकाची सविस्तर चिकित्सक चर्चा होते. त्यात आवश्यक बदलांती ते सभागृहाकडे परत पाठवले जाते. त्यानंतर सभागृहात विधेयकाच्या प्रत्येक भागावर स्वतंत्र चर्चा होऊन, भागनिहाय स्वतंत्र मतदान होते. यावेळी सदस्य विधेयकात सुधारणा सुचवू शकतात. त्या मान्य झाल्या तर त्या विधेयकाचा भाग होतात. तिसऱ्या वेळी मात्र विधेयकावर कोणतीही चर्चा होत नाही. संपूर्ण विधेयक स्वीकारायचे अथवा नाही केवळ यावर चर्चा होऊन ते विधेयक मान्य अथवा अमान्य होऊन दुसऱ्या सभागृहाकडे पाठवले जाते. दुसऱ्या सभागृहाकडे चार पर्याय असतात. एकतर विधेयक आहे तसे स्वीकारून त्याला मंजुरी देणे, विधेयकात सुधारणा सुचवून ते पहिल्या सभागृहाकडे परत पाठवणे, विधेयक पूर्णपणे अमान्य करणे, अथवा काहीही न करता तसेच प्रलंबित ठेवणे. संसदेच्या दोन्ही सभागृहांत विधेयकावरून मतभेद झाल्यास दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीची तरतूद घटनेत आहे. जर एका सभागृहाने विधेयक संमत करून पाठवल्यानंतर दुसऱ्या सभागृहाने त्यावर सहा महिन्यांपर्यंत कोणतीही कार्यवाही न केल्यास, अथवा दुसऱ्या सभागृहाच्या सूचना पहिल्या सभागृहाने नाकारल्यास अथवा दुसऱ्या सभागृहाने विधेयकच पूर्णपणे असंमत केल्यास राष्ट्रपती दोन्ही सभागृहाची संयुक्त बैठक बोलावू शकतात. लोकसभेचे अध्यक्ष अशा बैठकीचे प्रमुख असतात. मात्र, घटनात्मक सुधारणा विधेयक आणि अर्थ विधेयक यांच्याबाबत संयुक्त बैठकीची कोणतीही तरतूद नाही. अर्थात अशा प्रकारच्या संयुक्त बैठकींत बहुमत लोकसभेचे असल्याने अनेकदा लोकसभेच्या भूमिकेचा विजय होण्याची शक्यता असते. दोन्ही सभागृहांनी विधेयकाला मान्यता दिल्यानंतर ते मान्यतेसाठी राष्ट्रपतींकडे पाठवले जाते. राष्ट्रपती त्या विधेयकाला मान्यता देऊ शकतात अथवा ते पुनर्विचारासाठी संसदेकडे पाठवू शकतात. अर्थात संसदेने पुनर्विचार करून जर विधेयक आहे तसेच पुन्हा राष्ट्रपतींकडे पाठवल्यास त्यांना त्यास मान्यता द्यावीच लागते. मात्र राष्ट्रपतींनी त्या विधेयकावर काहीही न करता ते तसेच प्रलंबित ठेवले तर त्याचे कायद्यात रूपांतर होत नाही. केवळ राष्ट्रपतींची संमती असेल तरच त्याचे कायद्यात रूपांतर होते. राष्ट्रपती अशा प्रकारे विधेयक कितीही काळ प्रलंबित ठेवू शकतात. संसदेप्रमाणेच राज्य विधिमंडळात कायदेनिर्मितीची प्रक्रिया अवलंबली जाते. विधानसभेच्या बाबतीत विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात (अथवा ज्या राज्यांत एकच सभागृह आहे अशा परिस्थितीत विधानसभा) राष्ट्रपतींप्रमाणेच राज्यपालांना अधिकार असतात. त्यात अतिरिक्त अधिकार असा की राज्यपाल असे विधेयक राष्ट्रपतींच्या विचारार्थ राखून ठेवून राष्ट्रपतींकडे पाठवू शकतात. अशा परिस्थितीत राष्ट्रपतींनी मान्यता दिल्यावरच अशा विधेयकाचे कायद्यात रूपांतर होते. कोणताही कायदा हा नागरिकांच्या जीवनावर व्यापक परिणाम करत असतो, त्यामुळे राज्यघटनेला अशा कायद्यांवर सविस्तर चर्चा व विचारमंथन अपेक्षित आहे. म्हणूनच कायदेनिर्मितीची राज्यघटनेत विहित प्रक्रिया ही क्लिष्ट आहे.

लडाखवासींची लोककेंद्री विकासासाठी हाक

'विधानसभा नसलेला केंद्रशासित प्रदेश' राहिल्याने काय होते, हे चार वर्षे पाहिल्यावर गेले वर्षभर लडाखवासी आंदोलन करताहेत. या अहिंसक आंदोलनाला देशभरातून मिळणारा प्रतिसाद लोकशाहीवादी विकासाच्या बाजूने आहे...

लेह लडाख परिसरात १९७४ साली पर्यटन सुरू झाले त्या वर्षी अवघ्या ५०० पर्यटकांनी या परिसराला भेट दिली. आज ५० वर्षांनंतर २०२३-२४ मध्ये ही संख्या दरवर्षी सात लाखांच्या पलीकडे पोहोचली आहे. या प्रदेशातली मनःशांती पर्यटकांना इथे आणते! मात्र गेल्या पाच वर्षांत लडाखच्या नागरिकांना इतके बेदखल समजले गेले की, या साऱ्यांना अहिंसक मार्गाने लढावे लागले. २००९मध्ये प्रदर्शित झालेल्या 'थ्री इडियट्स'मधील रँचो या पात्रामुळे चर्चेत आलेले मॅगसेसे पुरस्कार विजेते सोनम वांगचुक यांनी २७ मार्चपासून २१ दिवस कडाक्याच्या बर्फवृष्टी, थंडीची पर्वा न करता लडाखमधील हुतात्मा स्मारकाजवळच्या मैदानात हजारो समर्थकांसह केवळ मीठ व पाणी घेऊन उपोषण केले. वांगचुक यांच्या या उपोषणानंतर तिथल्या महिला उपोषणास बसल्या. त्यांच्या १० दिवसांच्या उपोषणानंतर तेथील युवक उपोषण करणार आहेत. मग तेथील बौद्ध भिक्खूही या उपोषण सत्याग्रहात

सहभागी होतील. हे साखळी उपोषण केवळ लडाखसाठी नसून स्थानिकांना विकासाचा निर्णयाधिकार हवा यासाठी आहे, हे लक्षात घेऊन येत्या ७ एप्रिलला तिथे निघणाऱ्या 'पश्मीना मार्च'मध्ये देशभरातील लोक सहभागी होण्याची शक्यता आहे.

जम्मू-काश्मीर राज्याशी जोडल्या गेलेल्या लडाखला आपल्याला स्वतंत्र दर्जा मिळावा, असे अनेक वर्षे वाटत होते. पाच वर्षांपूर्वी ५ ऑगस्ट २०१९ रोजी अनुच्छेद ३७० रद्द करण्यात आल्याने, आपली मागणी मान्य झाली, आता आपल्याला आपला भूभाग, आपली संस्कृती अधिक चांगल्या आणि न्याय्य पद्धतीने जपता येईल, असेही तिथल्या जनतेला वाटत होते. प्रत्यक्षात मात्र अवघ्या ४५ हजार चौरस कि.मी. क्षेत्रफळाच्या आणि पावणेतीन लाख वस्तीच्या या छोटेखानी भूभागाच्या मानेभोवती केंद्राने आपली मूठ करकचून आवळण्यास सुरुवात केल्याची भावना तिथल्या रहिवाशांत निर्माण झाली आहे. विधानसभा नसलेला केंद्रशासित प्रदेश असे स्वरूप केंद्राने बहाल केल्यामुळे लडाखच्या विकासासंबंधीचे सर्व निर्णय दिल्लीच्या नोकरशाहीकरवी होऊ लागले. विधानसभा नसल्यामुळे स्थानिक जनतेला निर्णयात कोणताही अधिकार शिल्लक नाही. या संवेदनशील, आदिवासीबहुल विभागाच्या स्व-शासनासाठी १९९० च्या दशकापासून 'लडाख स्वायत्त पहाडी विकास परिषद' कार्यरत होती. तेथील आरोग्य व्यवस्था, जमिनीचा वापर आदी स्थानिक मुद्दयांबाबत ही स्वायत्त परिषद निर्णय घेत असे. त्यामुळे स्थानिकांच्या हितास प्राधान्य मिळत असे. उदा.- त्या परिसरात या स्वायत्त परिषदेमार्फत उभे राहिलेले सार्वजनिक रुग्णालय इतके सुसज्ज आहे की, एकही खासगी रुग्णालय तिथे औषधालाही सापडणार नाही! २०१९ च्या केंद्रशासित प्रदेशाच्या दर्जानंतर या स्वायत्त यंत्रणेला डावलण्यात आले. तिला कोणतेही अधिकार उरलेले नाहीत. थोडक्यात केंद्राचे शासन सुरू झाल्यावर लोकशाही अधिकारांचा संकोच, स्थानिक विकासाबाबत निर्णयप्रक्रियेत शून्य सहभाग, पर्यावरणीय असंवेदनशीलता असे सारे सुरू झाले आहे.

स्थानिक पशुपालक बेदखल

पिढयान्पिढया लडाखचे आदिवासी आणि पशुपालक ज्या जमिनींवर आपली गुरे चरण्यासाठी नेत होते, तो मैलोनमैलांचा भूभाग कुंपण टाकून स्थनिकांसाठी बंद करून टाकण्यात आला. या सुमारे १५० चौ.कि.मी. क्षेत्रफळातील

जमिनी भविष्यात खाणी खणण्यासाठी वा विशाल सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी या कंपन्या वापरणार असल्याचे दिसते. एकीकडे भारत सरकार अशा रीतीने स्थानिकांना आपल्या उपजीविकेच्या अधिकारांपासून बेदखल करत असताना गेल्या काही वर्षांत उत्तरेकडची बरीचशी जमीन चीनद्वारा बळकावली जात असल्याचे स्थानिकांना उघडया डोळ्याने पाहावे लागत आहे. सीमेच्या रक्षणासाठी अगदी १९४७ पासूनच भारतीय सैन्याच्या खांद्याला खांदा लावून दिसणारे लढाऊ लडाखी आता जम्मू-काश्मीरच्या गरम तव्यावरून काढून जणू केंद्राच्या आगीत फेकले गेले असल्याचे तेथील कार्यकर्ते बोलून दाखवत आहेत. ''केंद्राच्या अफाट आणि अचाट विकास प्रकल्पांमुळे आजवर हिमाचल, सिक्कीम आदी हिमालयीन प्रदेशांचे जसे वाटोळे झाले, तसेच आमचे होणार का?'', असे स्थानिक प्रतिनिधी विचारत आहेत.

लडाखी स्थानिकांच्या संघटना वर्षभरापासून यासाठी लढताहेत. लडाख शिखर परिषद (ॲपेक्स बॉडी) आणि कारगिल लोकशाहीवादी समन्वय (डेमोक्रॅटिक अलायन्स) या दोन संघटना यात आघाडीवर आहेत. केंद्राने या संघटनांच्या प्रतिनिधींशी गेल्या डिसेंबरात चर्चा सुरू केली. त्यातून हाती काही लागत नाही, हे पाहून सोनम वांगचुक यांनी जानेवारीत पाच दिवसांचे इशारा उपोषण केले. सोनम वांगचुक हे काही राजकीय नेते नाहीत. वैकल्पिक शिक्षण पद्धती आणि पर्यायी तंत्रज्ञान या क्षेत्रातील सृजनात्मक आणि रचनात्मक कार्याला त्यांनी वाहून घेतले आहे. अशा माणसाच्या आत्मक्लेशालाही सरकारने भीक घातली नाही. हे पाहून, ३ फेब्रुवारी रोजी सुमारे दहा हजार लडाखवासीयांनी मोर्चा काढून मागण्या स्पष्ट केल्या. लडाखला विधानसभा विरहित केंद्रशासित प्रदेश या दर्जाऐवजी संपूर्ण राज्याचा दर्जा द्या, स्थानिकांना स्वविकासाची संधी द्या- ही पहिली मागणी.

लडाखमध्ये ९७ टक्के आदिवासी जनता असल्याने भारतीय घटनेच्या सहाव्या सूचीत आमचा समावेश करा ही आंदोलकांची दुसरी प्रमुख मागणी आहे. यामुळे सहाव्या सूचीतील आदिवासीबहुल भागांसाठी जे निसर्ग संरक्षण प्राप्त आहे ते लडाखला मिळू शकेल. भाजपने २०१९ च्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी आपल्या जाहीरनाम्यात लडाखला स्वतंत्र राज्याचे आणि सहाव्या सूचित समावेश करण्याचे आश्वासन दिले होते; ते आता २०२४ च्या निवडणुकीत तरी पूर्ण करा, अशी रास्त भूमिका स्थानिकांनी घेतली आहे.

याशिवाय स्थानिक विकासात स्थानिकांना रोजगारात प्राधान्य आणि सध्या एकच लोकसभा जागा असलेल्या या प्रदेशात लेह आणि कारगिल अशा दोन लोकसभेच्या जागा मंजूर करा, अशाही मागण्या ३ फेब्रुवारीच्या त्या मोर्चाने केल्या.

मग १९ व २४ फेब्रुवारीला केंद्रातील अधिकाऱ्यांशी आंदोलक प्रतिनिधींच्या चर्चेच्या फेऱ्या झाल्या. ४ मार्चला दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याशीही चर्चा झाली. मात्र लडाखला राज्याचा दर्जा आणि सहाव्या अनुसूचित समावेश या मागण्या गृह मंत्रालयाने स्पष्टपणे धुडकावून लावल्या. सर्व मागण्यांसंदर्भात विचार करण्यासाठी केंद्रीय गृह राज्यमंत्री नित्यानंद राय यांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली. मागण्यांबाबत 'सहानुभूतीपूर्वक विचार करू. कायदेशीरदृष्टया आणि घटनात्मकदृष्टया काय शक्य आहे, हे तपासून पाहू' अशी गुळमुळीत भूमिका सरकारने जाहीर केली.

नेमकी कृती करा, या मागणीसाठी ६ मार्चपासून सोनम वांगचुक यांच्या २१ दिवसांच्या उपोषणाचा आणि हजारो नागरिकांच्या साखळी उपोषण- आंदोलनाचा पुढचा टप्पा सुरू झाला. हा मार्ग गांधीवादी आत्मक्लेशाचा आहे. हे साखळी उपोषण आंदोलन अनिश्चित काळापर्यंत सुरू ठेवण्याची तयारी आंदोलकांनी केली आहे. रविवारी ७ एप्रिलला आंदोलकांनी महात्मा गांधीजींच्या दांडी यात्रेपासून प्रेरणा घेत, पश्मीना मार्च काढण्याचे जाहीर केले आहे.

सात एप्रिलच्या दिवशी हजारो लडाखवासी चिनी सीमेच्या दिशेने चालायला सुरुवात करणार आहेत. भारत सरकारने पशू पालकांची गुरचरण जमीन किती प्रमाणात लुटली आहे आणि भारत सरकार कितीही नाकारत असले तरी चीनने लडाखची किती व्यापक जमीन हडपली आहे ते शोधण्यासाठी, साऱ्या जगाला हे सत्य सांगण्यासाठी हा 'लाँग मार्च' आहे! केंद्र सरकार दिलेली आश्वासने पाळेल, घटनेचे पावित्र्य जपेल अशी आंदोलकांना आशा वाटते आहे. मात्र सरकारने उलटे पाऊल उचलण्याचे ठरवले तर, 'जेलभरो आंदोलनास आम्ही तयार आहोत', अशी हाक आंदोलकांनी दिली आहे. गांधीजींच्या पावलावर पाऊल टाकत, असहकार आंदोलनाचा पवित्रा त्यांनी जाहीर केला आहे. आमच्या न्याय्य मागण्या नाकारणाऱ्यांचे आदेश आम्ही पाळणार नाही, संपूर्ण असहकार करू, असे आंदोलकांनी ठणकावून सांगितले आहे.

देशव्यापी समर्थनाची हाक

७ एप्रिलला देशभर लोकांनी आपापली जंगले, शेतजमिनी, पाण्याचे स्त्रोत, नद्या, डोंगर आदी जतन करण्याच्या भूमिकेतून आणि कॉर्पोरेट कंपन्यांची मनमानी आणि विनाशकारी विकास रोखण्यासाठी कटिबद्ध व्हावे व त्या त्या ठिकाणच्या पर्यावरणीय प्रश्नांवर जागोजागी पदयात्रा काढाव्यात, असे आवाहन लडाखवासीयांनी देशातील तमाम नागरिकांना केले आहे. देशभर या आंदोलनाला व्यापक समर्थन लाभते आहे. गेल्या महिन्याभरात देशात अनेक ठिकाणी नागरिकांनी समर्थन उपोषणे केली. पुण्यातील नदी वाचवा समितीच्या कार्यकर्त्यांचे ११ दिवसांचे उपोषण व २३ मार्च या शहीद भगत सिंग शहादतदिनी राज्यात ठिकठिकाणी २५० हून अधिक नागरिकांचे उपोषण पार पडल्यानंतर आता 'जनआंदोलनांचा राष्ट्रीय समन्वय'च्या ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर यांच्या आवाहनानुसार येत्या २० ते ३० एप्रिल दरम्यान देशभर विनाशकारी विकासाच्या विरोधात आणि स्थानिकांना विकासप्रक्रियेत निर्णयाचा अधिकार या मुद्दयांवर जनजागृती अभियान सुरू करण्यात येणार आहे.

सगळा देश लोकसभेच्या निवडणुकीत आणि त्यासाठीच्या प्रचारात गुंतलेला असताना, निवडणूक रोख्यांमार्फत कोटयवधी रुपयांच्या घोटाळ्याचा मुद्दा प्रचारात तापलेला असताना; लोकशाहीचा अधिक समर्पक, मूलभूत, व्यापक आणि सर्वसमावेशक आशय या निमित्ताने जनमानसात घुसळवण्याची संधी लडाखमधील निसर्गप्रेमी, अहिसक आणि सत्याग्रही आंदोलकांनी साऱ्या जगाला पुन्हा मिळवून दिली आहे!

पंतप्रधान आवास योजनेचे अनुदान बंद झाल्याने गृहखरेदीला फटका



● आर्थिक वर्ष- दस्तसंख्या- एकूण वसुली (कोटींत)- टक्केवारी ●
- मार्च २०२२- १ लाख ३७ हजार ६६७- ११२६ कोटी ३६ लाख- १०८.६२
- मार्च २०२३- १ लाख ४१ हजार ८९९- १५१८ कोटी २६ लाख- १४४.६०
- मार्च २०२४ - १ लाख ४७ हजार ९६७- १४४८ कोटी १४ लाख-८२.७५

नाशिक :

विविध मालमत्ता खरेदी-विक्रीपोटी सरकारी तिजोरीत जमा होणाऱ्या मुद्रांक शुल्काच्या महसुलात यंदा ७० कोटींची घट झाली आहे. मार्च २०२३ अखेर १५१८ कोटी २६ लाख रुपये वसुली झाली होती, ती नुकत्याच संपलेल्या मार्चअखेरीस १४४८.१४ कोटी झाली आहे.

सरकारने पंतप्रधान आवास योजना बंद केल्याने ही घट झाल्याची शक्यता असून, ग्राहकांना या योजनेची प्रतीक्षा असल्याने अनेकांनी घरखरेदी लांबविल्याने याचा फटका मुद्रांक शुल्काला बसला आहे. देशात उत्तम हवामानासाठी प्रसिद्ध असलेले शहर म्हणून नाशिकचा नावलौकिक आहे.

मुंबई-पुण्याबरोबरच राज्यभरातून अनेकांचा नाशिकला घर घेण्याकडे ओढा असतो. मात्र, नाशिकचा भौगोलिक विस्तार वाढला त्या प्रमाणात मुलभूत सुविधा वाढल्या नाहीत. तसेच पुरेसे कारखानेही न आल्याने नाशिकमधील अनेक युवक नोकरी-धंद्यानिमित्त बाहेर जाऊ लागले. याचा परिणाम शहरातील व्यवहारावरही झाला.

शहरात मोठमोठ्या इमारती बांधून तयार आहेत. मात्र, त्यांना ग्राहक नाहीत. याचा परिणाम अर्थव्यवस्थेवरही झाला आहे. मुद्रांक शुल्क विभागाला दरवर्षी खरेदी विक्रीचे ठराविक लक्ष्य देण्यात येते. मुद्रांक विभागाकडून दिलेल्या लक्ष्यापेक्षा अधिक दस्तवेजाची नोंदणी केली जाते. मात्र, यावर्षी नोंदणीसाठी दिलेल्या उद्दिष्टात १७.२५ टक्क्यांनी घट झाली आहे. मुद्रांक शुल्क विभागात विवाह नोंदणी, गहाण, बक्षीसपत्र अशा सर्वच नोंदींचा समावेश असतो.

मात्र, सर्वाधिक महसूल मालमत्ता खरेदी-विक्रीतूनच मिळत असतो. मागील दोन वर्षांत यंदा दस्तावेज नोंदणीच्या संख्येत वाढ झाली आहे. मात्र, मुद्रांक शुल्कात घट झाली आहे. त्यामुळे घरांची विक्री घटल्याचे चित्र आहे.

Police Issue Advisory for Gudi Padwa Processions, Check Timings, Diversions, and Alternate Routes

Thane

In anticipation of the Gudi Padwa procession scheduled to be held in Thane, the city's traffic control branch has implemented alterations to traffic routes in order to prevent congestion. The New Year's procession, organized by Shri Kopineshwar Cultural Trust, is set to traverse through Naupada and Kopri areas. Deputy Commissioner Vinaykumar Rathod has introduced modifications to traffic routes in Naupada, Kopri, and Thane Nagar areas starting tomorrow from 6 am onwards, aiming to alleviate potential traffic congestion.

Alternate routes:

- Vehicles traveling from Dr. Moose Chowk in Naupada to Hotel Sai Kripa via Dr. Mus Chowk are prohibited from entering Dr. Moose Chowk from Chintamani Chowk at Jambhli Naka. An alternative route has been designated. Similarly, vehicles from Almeida Road destined for Gokhale



Road are banned from entering Almeida Chowk, with an alternative route provided via Tembhi Naka to Charai Kat.
- Vehicles bound from Gokhale Road to Ram Maruti Road via Puna. Gadgil Chowk are diverted through Teen Hat Naka, as entry to Gokhale Road is restricted. Likewise, vehicles traveling from Tower Naka to Gadkari Circle are rerouted via Tembhi Naka instead of Tower Naka.
- TMT buses traveling from Teen Hath Naka to Thane station via Hariniwas Malhar Marg will now follow Nitin Company Marg and Khopat Tembhi Naka after being barred from Teen Hath Naka.
- Heavy vehicles traveling from Khopat to Thane station via Almeda Chowk are advised to avoid Almeda Chowk and use Khopat Dr. Ambedkar Road and Nitin Circle Road instead.
- Parking is prohibited on both sides of the road at Chintamani Chowk, Gadkari Circle, and in front of St. John's School. Additionally, parking is restricted between Gajanan Maharaj Chowk and Gokhale Road, and from Sai Kripa Hotel to SBI Corner on Ram Maruti Road.

Exemptions to this traffic control notification include police vehicles, fire brigade, ambulances, green corridor, oxygen gas vehicles, and other emergency service vehicles.

Shepherd's all-round heroics help MI register first win in the league

Mumbai

Mumbai Indians's (MI) Romario Shepherd inflicted the most damage on Delhi Capitals (DC) in the IPL on Sunday night. First, by hammering a 10-ball 39 not out (3x4, 4x6) at No.7 and then by chipping in with 1-54, a wicket that included the dangerous David Warner (10) to help MI open their account in this year's edition.

MI's 29-run win under the Wankhede lights provided the spark their disappointing campaign needed amidst an uproar over the appointment of Hardik Pandya as captain with India captain Rohit Sharma playing under him.

Romario Shepherd, the all-rounder from Guyana, was put to the test, facing DC pacer Anrich Nortje in the 20th over. Nortje had dismissed MI's two big stars—Hardik Pandya (33-ball 39, 3x4, 1x6) and Suryakumar Yadav (0) in his first three overs.

But Shepherd ensured the South African pacer Nortje witnessed the most frustrating day of his IPL career when his fourth over, the and innings' 20th, went for 32 runs. Shepherd smashed Nortje all over the park with four sixes and two fours, his sequence of shots being 4, 6, 6, 6, 4 and 6.

Crucial sixth-wicket stand

In the process, Shepherd and Tim David (21-ball 45 not out, 2x4, 4x6) stitched a sixth wicket unbeaten stand of 53 off just 13 balls. Earlier, put into bat, MI openers Rohit Sharma (27-ball 49, 6x4, 3x6) and Ishan Kishan (23-ball 42, 4x4, 2x6) and then skipper Hardik Pandya (33-ball 39, 3x4, 1x6) helped MI post 234-5- in the allotted 20 overs. DC's India pacer Ishant Sharma (0-40) experienced a tough time in his first over itself when Rohit smashed the ball with the crowd chanting Rohit, Rohit. Jhye Richardson (0-40) was hit for a couple of sixes when the bowler was introduced in the fourth over.

Chasing a formidable 235, DC's Mumbai boy Prithvi Shaw (40-ball 66, 8x4, 3x6), No.4 Tristan Stubbs (25-ball 71 not out, 3x4, 7x6) and one-drop Abishek Porel (41, 5x4) tried their best, but it was not enough to beat MI on their home ground. DC skipper Rishabh Pant could score only one, dismissed by pacer Gerald Coetzee (4-34).

DC start well, but falter later

DC were 94-1 at the half-way mark, but it got tougher when 55 were needed in the last 12 balls. Pacer Jasprit Bumrah (2-22) showed his class again. Shepherd was Player of the match in his debut game for MI. "At the back of my mind I was saying that any opportunity I get, I would try and capitalise on it. I knew that once I go in there I have to try and get as much as possible, especially in the last couple of balls. I just keep a clear mind and try to hit every ball and I did exactly that. It was a fantastic feeling [to get those runs]," he said.

Powerloom unit worker murdered in Thane

Cops launch probe

Mumbai

A 44-year-old powerloom unit worker in Bhiwandi town of Maharashtra's Thane district has been murdered allegedly by an unidentified person, police said on Monday, reported news agency PTI. The body of Anwarali Vakil Ansari, with injuries on various parts including head, ears and eyes, was found near the Kamwari river on Friday evening, an official from Bhiwandi taluka police station said, reported PTI.

The proprietor of the powerloom unit where Ansari was employed identified the body and filed a police complaint, reported PTI. The powerloom unit worker used to consume liquor often with a colleague, the police said quoting a complaint, reported PTI. The body was sent to a government hospital for postmortem. The police have registered a case against an unidentified person under Indian Penal Code section 302 (murder) and launched a probe into it, the official said.

In another case, the police in Maharashtra's Thane district have claimed to have detected nearly 12 burglary cases with the arrest of two men, an official said on Saturday, reported PTI.

The arrest of Avinash Dhanaji Shinde and Samsung Ruben Daniel, both 25, came during the investigation into a housebreaking incident at Kalyan in February, reported PTI. Using CCTV footage, technical and other inputs, the police first arrested Shinde from the Ambernath area. Subsequently, his associate Daniel was arrested from Kalyan, reported PTI.

The duo was involved in about a dozen similar crimes committed in Kalyan and Maharashtra's Jalgaon and neighbouring Telangana state, the official said citing their interrogation. Senior inspector Shailesh Salvi of MFC police station in Kalyan said that cops have recovered stolen goods worth nearly Rs 3.62 lakh from the duo, reported PTI.

Of the two, Daniel is named in nine cases across Maharashtra and Telangana, he added.

आम्हाला मेहनतीचे पैसे द्या, फुकटच्या साड्या नको !

रेशनिंगसोबत महिलांना दिलेल्या साड्या तहसील कार्यालयात केल्या परत

■ **जव्हार** : आम्हाला फुकटच्या साड्या नको, त्या खरेदी करण्यासाठी सक्षम बनवा' असे म्हणत जव्हार तालुक्यातील महिलांनी रेशनिंग विभागाने दिलेल्या साडया तहसील कार्यालयात परत केल्या.जव्हारमधील महिलांच्या या आंदोलनाने संपूर्ण जिल्याचे लक्ष वेधले आहे. 'आम्ही काय भिकारी आहोत काय?' असे आंदोलनकर्त्या शकुंतला भोईर कडाडल्या.

रोजगार हमी योजनेचे काम केले. दहा-दहा मस्टर भरलेत. चार-पाच महिन्यांपासून त्यांचे पैसे दिले नाहीत. आमच्या मेहनतीचे आम्हाला द्या ना. या साड्या घेऊन काय करू, आम्ही काय भिकारी आहोत काय? असे म्हणत महिलांनी संताप व्यक्त केला.कष्टकरी संघटनेचे कार्यकर्ते अजय भोईर यांनी सांगितले. की, साड्या वाटप करणे आणि रिकाम्या पिशवीवर एखाद्या व्यक्तीचा फोटो छापून देण्याने काय होणार आहे? योजना राबवा, शिकलेल्या मुलांना रोजगार द्या, ते सोडून एक साडी दिली जाते.जव्हार तहसील कार्यालयातील पुरवठा अधिकाऱ्यांना त्यांनी खडा सवाल केला.त्यावर पुरवठा अधिकारी म्हणाले, आचारसंहिता लागू झाल्यापासून पिशव्या वाटप थांबवले आहे. जव्हार तालुक्यातील महिलांनी तहसील कार्यालयात जाऊन रेशनअंतर्गत वाटप करण्यात आलेल्या साड्या परत केल्या. कष्टकरी संघटनेच्या नेतृत्वात हे आंदोलन करण्यात आले. तसेच अंत्योदय योजनेअंतर्गत ज्यांना धान्य मिळते, अशा लाभार्थ्यांना धान्यासोबत प्रत्येकी एक साडी आणि बाजार करण्यासाठी पिशवी देण्यात आली. या पिशवीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे छायाचित्र आहे.

या महिला प्रातिनिधिक स्वरूपात १०० साड्या आणि ७२ बॅगा परत करण्यासाठी तहसील कार्यालयात पोहोचल्या. मात्र, तिथे तहसीलदार उपस्थित नसल्याने, तहसीलदार कार्यालयातील पुरवठा अधिकाऱ्यांकडे महिलांनी आपली भूमिका मांडून साड्या, आणि शिधा पिशव्या परत केल्या.जव्हारमधील महिलांच्या या भूमिकेला पाठिंबा देत, आंदोलनासाठी पुढाकार घेणाऱ्या कष्टकरी संघटनेचे नेते ब्रायन लोबो यांनी म्हटले की, ''रेशनिंगद्वारे अशाप्रकारे साड्या, बॅग देणे म्हणजे योजनांची अंमलबजावणी फोल ठरल्याचे दिसून येते. अशा मोफत साड्या देण्यापेक्षा त्या साड्या खरेदी करण्यासाठी महिलांना सक्षम करणे हा उद्देश शासनाचा हवा. मात्र, तसा उद्देश दिसत नाही.'' लोबो पुढे म्हणाले की, ''शासनाच्या आहेत त्या योजना नीट अंमलात आणून, विकास लोकांपर्यंत पोहोचवण्याचे सोडून, साड्या वाटून आणि मोदींचे छायाचित्र छापलेल्या बॅग वाटप करणे, म्हणजे लोकांची फसवणूक आहे, आणि लोकांवर अन्याय सुद्धा आहे.दरम्यान, अशाच प्रकारचे आंदोलन ८ एप्रिलला पालघर जिल्ह्यातील डहाणू आणि विक्रमगड तालुक्यातही केले जाणार आहे, अशी माहिती कष्टकरी संघटनेच्या ब्रायन लोबो यांनी दिली.

गोदामामधून लाखोंच्या ऐवजाची चोरी

■ **नवीन पनवेल** : गोडाऊनची भिंत फोडून त्यावाटे आत प्रवेश करून चोरट्यांनी सव्वासात लाख रुपये किमतीच्या ऐवजाची चोरी केल्याप्रकरणी कळंबोली पोलीस ठाण्यात चोराविरोधात गुन्हा दाखल केला आला. नैनाराम बिश्नोई हे कळंबोली येथे राहत असून, त्यांचा स्टील सेल-पर्चेसचा व्यवसाय आहे. त्यांनी वेगवेगळ्या आकाराच्या वजनाच्या स्टील प्लेट कॉइल गाळ्यात ठेवल्या होत्या. ७ लाख २५ हजार ४०० रुपये किमतीच्या ७१ कॉइल चोरट्यांनी गोडाऊनची भिंत फोडून आत प्रवेश करून चोरून नेल्या. या प्रकरणी बिश्नोई यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा नोंद करून त्यांचा शोध सुरू केला आहे.

मोबाईल हिसकावणारे दोन आरोपी गजाआड

■ **मुंब्रा** : कळवा पोलिसांनी चोरीच्या दुचाकीवरुन महिलेचे मोबाईल हिसकावणाऱ्या दोन आरोपींना अवघ्या चार तासात अटक केली आहे. कळवा पूर्व रेल्वे स्टेशनजवळ मफतलाल तलाव येथून एक महिला पायी चालत खारेगाव नाक्याच्या दिशेने जात असताना तिच्या पाठीमागून येणाऱ्या मोटरसायकलस्वारांनी महिलेच्या हातातील मोबाईल खेचून खारेगावच्या दिशेने पळून गेले. या प्रकाराबाबत महिलेच्या तक्रारीवरून कळवा पोलीस स्टेशन या ठिकाणी गुन्हा दाखल करण्यात आला.

कळवा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक उतेकर यांनी गुन्ह्याचा तपास करण्यासाठी कळवा गुन्हे प्रकटीकरण पथकाचे प्रमुख, पोलीस उपनिरीक्षक सागर सांगवे व त्यांच्या पथकाला सूचना व मार्गदर्शन करून आरोपी पकडण्याची कामगिरी सोपवली. तपास पथकात पोलीस उपनिरीक्षक सांगवे व रमेश पाटील,श्रीमंत राठोड, राहुल पवार, अमोल ढावरे, प्रशांत लवटे,शहाजी एडके, दादासाहेब दोरकर यांचा समावेश होता.

आरोपीचा सीसीटीव्ही फुटेज तसेच गोपनीय बातमीदार यांच्या मदतीने शोध घेऊन अवघ्या चार तासांमध्ये गुन्ह्यातील २ आरोपींना अटक करण्यात आली. या गुन्ह्यामध्ये अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये मुळ पश्चिम बंगालच्या मात्र सध्या कळव्यात राहणाऱ्या नाजीबुल शेख व परवेज हुसेन यांचा समावेश आहे.

चक्क सरन्यायाधीशांचे बनावट आधारकार्ड बनवले

सामाजिक कार्यकर्त्याने समोर आणला मोठा घोटाळा

■ **छत्रपती संभाजीनगर** : लोकसभा निवडणुकीत मतदान करण्यासाठी महत्त्वाचा पुरावा असलेले आधारकार्ड पैसे देऊन बनावट बनवले जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. ही गोष्ट प्रशासनाच्या लक्षात आणून देण्यासाठी सामाजिक कार्यकर्त्याने चक्का देशाचे सरन्यायीश धनंजय चंद्रचूड यांच्या नावानेच स्वतःचे आधारकार्ड बनवून घेतलं आहे. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

नाव आणी पत्ता दुसऱ्याचा मात्र फोटो स्वतःचा अशाप्रकारे सेतूचालक बनावट आधारकार्ड बनवत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. श्रीरामपूर तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते सुनिल मुथ्था यांनी स्वतःचा फोटो असलेले मात्र सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांचे नाव आणि पत्ता असलेले एक आधारकार्ड बनवून घेतले आहे. केवळ प्रशासनाच्या हि गोष्ट लक्षात यावी यासाठी त्यांनी हे आधारकार्ड बनवले आहे. लोकसभेला आधारकार्ड दाखवल्यानंतर मतदान करता येणार आहे त्यामुळे कुणाच्याही नावे अशाप्रकारे कार्ड बनवून मतदान केलं जावू शकतं. त्यामुळं आधारकार्डचा गैरवापर टाळण्यासाठी प्रशासनाने या गोष्टीकडे गंभीरपणे बघावं आणि निवडणूक आयोगाने मतदानकेंद्रात आधारकार्ड खरे कि खोटे हे तपासण्याची यंत्रणा निर्माण करावी अशी मागणी सुनील मुथ्था यांनी केली आहे.

आधारकार्ड हा ओळखपत्राचा पुरावा म्हणून ग्राह्य धरला जातो. त्यामुळं आधारकार्डचा गैरवापर करण्यात येतो. अशाप्रकारे बोगस आधारकार्ड दाखवून मतदान करणारे असतील तर निवडणुकीत कितीतरी बोगस मतदान होईल. त्यामुळं पारदर्शी निवडणुका या संकल्पनेलाच धक्का बसेल. हा गैरप्रकार उघडकीस आणण्यासाठी मी एका एजंटतर्फे स्वतःच्याच नावाने एक बोगस आधारकार्ड तयार केले. जेणेकरुन हे प्रशासनाच्या समोर येईल, असं सुनील मुथ्था यांनी म्हटलं आहे.

मी एका एंजटला हाताशी घेऊन सरन्यायाधीश चंद्रचूड यांच्या नावाचं कार्ड बनवले. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे ते मला बनवून मिळाले. याचाच अर्थ ते कोणाच्याही नावाने आधार कार्ड बनवून देऊ शकतात आणि याच्या आधारे मतदान होऊ शकते. आता हेच कार्ड मी दाखवले तर मतदान केंद्रावर गेल्यावर याची पडताळणी करण्यासाठी काहीच साधने उपलब्ध नाहीयेत.याचाच अर्थ मी मतदान करुन निघून जाऊ शकतो. म्हणजेच निवडणुकीत बोगस मतदान होऊ शकते आणि काही विशिष्ट्य वगार्ची लोक याचा फायदा घेऊ शकतात. त्यामुळं मतदानाचा टक्कादेखील वाढणार आहे, अशी भिती सुनील मुथ्था यांनी व्यक्त केली आहे.

जे सेतू केंद्रवाले असे आधार कार्ड बनवून देत आहेत. त्यांच्यावर नियंत्रणच नाहीये. कारण ते खासगी कंपन्यांकडे देण्यात आलेले आहे. हा सगळा भोंगळ कारभार चालला आहे. हे सगळे प्रकार होऊ नये, पारदर्शी निवडणुका होणार नाहीत. काही लोक याचा गैरफायदा घेण्याची शक्यता आहे. म्हणून मी ठरवले की हा प्रकार उघडकीस आणायचा. अशा प्रकारे जे आधार कार्ड बनवत आहेत. तसंच, बोगस आधारकार्डच्या सहाय्याने कोणी मतदान करत असेल तर मतदानकेंद्रावरती आधार कार्डच्या पडताळणीची यंत्रणा असावी, अशी मागणी सामाजित कार्यकर्ते सुनील मुथ्था यांनी केली आहे.

घरातून दागिने, रोकड नेली चोरून

■ **पनवेल** : घराच्या दरवाजाचा लॉक तोडून अज्ञात चोरट्याने घरातील सोन्या-चांदीचे दागिने, रोख रक्कम आणि घड्याळ चोरून नेल्याप्रकरणी कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. गोरखनाथ सरगर हे कळंबोली सेक्टर ३-ई येथे राहतात. ते कामावर जाताना घराला लॉक लावून गेले होते. ते दुपारी घरी आले असता, बेडवरील सर्व सामान अस्ताव्यस्त आढळून आले व कपाटाचे दोन्ही दरवाजे उघडे असल्याचे दिसले. त्या वेळी त्यांनी घरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता, एक इसम दरवाजातून घरात प्रवेश करून आत आला आणि सोन्या-चांदीचे दागिने, रोख रक्कम व घड्याळ घेऊन तो निघून गेला.

कडधान्य हमीभावासाठी शेतकरी आग्रही

■ पिळवणूक थांबवण्याची तहसीलदारांकडे मागणी

■ **वाडा** : गेली अनेक वर्ष खरिप हंगामात भात हे वर्षभरातील एकमेव पीक घेणारा शेतकरी गेल्या चार ते पाच वर्षांपासून रब्बी हंगामातील तुर, हरभरा, वाल, मुग अशी कडधान्य, डाळींची पिके घेऊ लागला आहे. मात्र या कडधान्याची खरेदी करण्याची व्यवस्था शासनाकडे नसल्याने या कडधान्यांची विक्री येथील शेतकऱ्यांना अल्प दरात करावी लागत आहे. या कडधान्याला शासनाने हमीभाव देऊन त्याची खरेदी करावी अशी मागणी शेतकऱ्यांकडून केली जाऊ लागली आहे.

पालघर जिल्ह्यात जवळपास १७ हजार हेक्टर क्षेत्र हे रब्बी पिकाचे आहे. यामध्ये १४ हजार हेक्टर क्षेत्रावर वाल, तुर, हरभरा, मुग ही कडधान्य पिके घेतली जातात. तर उर्वरित रब्बी क्षेत्रात तिळ, सुर्यफुल, मोहिरी या तेलबिया पिकांसह भाजीपाला घेतला जातो.पालघर जिल्ह्यात रब्बी हंगामात मोठया प्रमाणावर घेतल्या जाणाऱ्या कडधान्याची विक्री व्यवस्था शासनाकडून केली जात नसल्याने स्थानिक व्यापारी शेतकऱ्यांना अल्प दर देऊन लूट करत असल्याचे चित्र दिसून येत आहे.वाल - ८ हजार रुपये प्रति क्विंटल, मुग ७००० रुपये प्रति क्विंटल, हरभरा ५००० रुपये प्रति क्विंटल तर तूर ६००० रुपये प्रति क्विंटल असा अल्प दर देऊन खरेदी करताना दिसून येत आहेत. मात्र हेच व्यापारी या कडधान्याची विक्री ३० ते ३५ टक्के अधिक दर घेऊन ठाणे, मुंबई, कल्याण येथील व्यापाऱ्यांना विक्री करत आहेत.या कडधान्याची चांगल्याप्रकारे साठवणूक केली नाही तर या धान्याला किड लागण्याची अधिक शक्यता असते.

त्यामुळे शेतकरी धान्याची काढणी, मळणीची कामे तत्काळ करुन त्याची विक्रीही लगेचच करतात. येथील शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या कडधान्याची विक्री शहरी भागात थेट शेतकरी ते ग्राहक अशी करण्यासाठी कडधान्य महोत्सव आयोजित करण्यात यावेत अशी मागणी गेल्या अनेक वर्षांपासून येथील शेतकरी करत आहेत. मात्र त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे.स्थानिक व्यापाऱ्यांकडून शेतकऱ्यांची लूट थांबविण्यासाठी कडधान्याला हमीभाव देऊन त्याची खरेदी आदिवासी विकास महामंडळाच्या माध्यमातून करण्यात यावी. अशी मागणी शेतकरी करत आहेत.

फसवणुकीतील साडेचार लाख पोलिसांनी मिळवून दिले परत

■ **मीरा रोड** : काशिमीरा परिसरात राहणाऱ्या महिलेला शेअर मार्केटमध्ये ऑनलाईन गुंतवणूक करण्यास सांगून, फसवणूक केलेले साडे चार लाख रुपये काशीगाव पोलीसांनी तपास करून परत मिळवून दिले आहेत.

मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील काशिमीरा परिसरात राहणाऱ्या तहसिना अफ्रोज खान यांना शेअर मार्केट मध्ये गुंतवणूक केल्यास जास्त नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवण्यात आले. त्यानंतर त्यांना ऑनलाईन पैसे गुंतवण्यास सांगून त्यांची आर्थिक फसवणूक केली होती. या फसवणूकीबाबत काशिमीरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या तक्रारीची तत्काळ दखल घेवून तक्रारदार यांच्या झालेल्या व्यवहाराबाबत माहिती प्राप्त करण्यात आली. प्राप्त माहितीचे अवलोकन केले असता तक्रारदार यांची रक्कम वेगवेगळ्या

बँकखात्यात वळती झाल्याचे दिसून आले. त्या अनुषंगाने तक्रारदार यांची रक्कम गोठवण्याबाबत संबंधित बँकेसोबत पत्रव्यवहार करुन संशयित खात्यामध्ये रक्कम गोठवण्यात आली. त्यानंतर न्यायालयाकडून तक्रारदार यांची रक्कम परत मिळण्यासाठी काशीगाव पोलीस ठाणेचे अधिकारी, अंमलदार यांनी वेळोवेळी पाठ पुरावा केला. तक्रारदार यांची फसवणूक झालेले साडे चार लाख रुपये रक्कम त्यांच्या खात्यावर परत मिळवून देण्यात आली.

लघु पाटबंधारे योजनेच्या धरणांमध्ये ३७ टक्के जलसाठा

■ **मुरबाड** : मुरबाड तालुक्यातील ग्रामीण व आदिवासी पट्टयात यंदाचा अतिशय कडक उन्हाळा जाणवत आहे.पाण्याचा प्रश्न निर्माण होण्याची भीती व्यक्त होत असली तरी तालुक्यातील पाच धरणांमध्ये जवळपास ३७ टक्के जलसाठा आहे.

यंदा फेब्रुवारीपासूनच कडक उन्हाळा जाणवत असल्याने लघुपाटबंधारे योजनेच्या धरणातील पाण्याची पातळी अधिक खोल गेल्याचे चित्र दिसून येत आहे सध्याच्या घडीला जलसाठा जवळपास ३७ टक्के पर्यंत गेला आहे.तसेच विढे धरणाचे पाणी नियोजन अतिशय चांगले आहे. या विढे धरणाच्या पाण्यामुळे कोरावळे गावातील शेतकरी वर्ग विविध भाजीपाल्याची पिके घेऊन आपला उदरनिर्वाह करत आहेत.मानिवली ल. पा. योजनेच्या धरणामध्ये पाण्याची पातळी, १.१४ जामुर्डे धरणाची

पातळी- १.६२ , वांजले धरणाची पातळी-०.४८ ,खांडपे धरणाची पातळी १०७.८० ठाकूरवाडी (शिरोली मानिवली धरणाची पातळी,१.१७ तर शिरोशी (केटीबी) धरणात पाण्याची पातळी१०४.९७. सध्या अशा परिस्थितीत धरणाच्या पाण्याची पातळी दिसून येत आहे.

त्यामुळे सरासर ३७ टक्के पाणीसाठा धरणात उपलब्ध आहे. त्यामुळे सध्याच्या घडीला मुरबाड तालुक्यातील धरणामध्ये पाच धरणामध्ये ४.७७ द.ल.घ.मीटर उपलब्ध साठा आहे. तर ठाकूरवाडी धरणामध्ये १.१७ साठा आहे.तर ३७४ हेक्टर जमीन धरणाच्या क्षेत्राखाली भिजली आहे अशी माहिती पाटबंधारे उपविभाग मुरबाडचे उपविभागीय अभियंता सु.रा. दांडकर यांनी दिली आहे.तर या पाच धरणामुळे तालुक्यातील शेतकरी भाजीपाला पिकांसाठी चांगले नियोजन करत आहे व त्याचा फायदा शेतकरी वर्गाला होत आहे.

उन्हाचा तडाखा वाढताच लिंबाचा वाढला भाव

एका लिंबासाठी दहा रुपये मोजण्याची वेळ

■ **मोखाडा** : मोखाडा तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून वातावरणातील उष्णता वाढल्याने फळांच्या रसाबरोबर लिंबूपाणी, लिंबू सरबतांची मागणी वाढली आहे.त्यामुळे बाजारात लिंबाची ही मागणी मोठया प्रमाणात वाढली आहे.परिणामी, घाऊक बाजारात लिंबाच्या दरात वाढ झाली आहे. घाऊक बाजारात लिंबू १५० ते १७५ रुपये किलोच्या दराने विकले जात आहेत.तर किरकोळ बाजारात एका लिंबासाठी दहा ते पंधरा रुपये मोजावे लागत आहेत.त्यामुळे उन्हाळयात लिंबाचा तोरा वाढला आहे.

आता एप्रिल महिना सुरू असून लिंबाचा दर मे संपेपर्यंत तरी हेच चित्र बाजारात असणार असल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली.त्यामुळे लिंबू खरेदी करताना एक किंवा दोन लिंबू घेऊनच ग्राहकांना समाधान मानावे लागत आहे.लिंबाचे अनेक फायदे असल्यामुळे त्याची मागणी वर्षभर असते.उन्हाळयात ही मागणी अधिक वाढते.या दिवसांमध्ये लिंबाचे सरबत जवळपास घरोघरी बनवतात.त्याचसोबत जेवणातील लिंबाचा वापर देखील वाढतो.परिणामतः पुरवठयाच्या प्रमाणात मागणी दुप्पट होते.यंदाही अशीच स्थिती कायम आहे. मार्चपासून लिंबाचे दर सातत्याने वाढत होते.मार्चमध्ये शेकड्यामागे १२५ ते १५० रुपयांदरम्यान लिंबू विकले जात होते.त्यापूर्वीचा दर १०० रुपये देखील होता.पण उन्हाळा सुरू होताच आवक कमी झाली आणि दरवाढ सुरू झाली आहे.

उन्हाळा संपेपर्यंत दर चढेच

भाजीपाला बाजारपेठेत लिंबाच्या आकारानुसार त्याचा दर ठरतो. एकदम लहान आकाराचे लिंबू असल्यास दहा रुपयांना एक, तर वीस रुपयांना तीन अशा दराने किरकोळ बाजारात विक्री सुरू आहे. उन्हाळा संपेपर्यंत तरी लिंबाचे दर असेच चढे राहतील, अशी शक्यता आहे.

दुष्काळी परिस्थितीचा फटका

भारत हा जगातील सर्वांत मोठा लिंबू उत्पादक देश आहे. यंदा बदलते हवामान आणि दुष्काळी परिस्थितीचा फटका लिंबाच्या पिकाला बसला आहे. दुष्काळामुळे अनेक ठिकाणी लिंबाच्या बागांचे नुकसान झाले आहे .त्यामुळे बाजारातील मागणीनुसार पुरेसा पुरवठा न झाल्याने लिंबाच्या किमतीत वाढ झाल्याचे दिसून येत आहे.

> दरवर्षी उन्हाळयात लिंबाला मोठी मागणी असते. हिवाळयात दर कमी असतात. तेव्हा नाशिक तसेच आजूबाजूच्या परिसरातून स्थानिक लिंबू बाजारात येतो. उन्हाळयात बाहेरून येणारा माल जरा महाग असतो.त्यामुळे ग्राहकांना दरवाढीचा सामना करावा लागतो.
>
> – **विजय कोठेकर**, भाजीविक्रेते

वीजपुरवठा खंडित झाल्याने नागरिकांचे हाल

■ **पालघर** : पालघर पूर्वेकडी गांधीनगर आंबेडकर नगर व परिसरात महावितरणाने कुठलीही सूचना न देता सुमारे सहा तासापेक्षा अधिक वेळ वीजपुरवठा खंडित केल्याने उकाड्याने त्रस्त असलेल्या नागरिकांच्या हालाला पारावर उरला नाही.

पालघर शहरात व आजूबाजूच्या गावांमध्ये शुक्रवारी वीजपुरवठा खंडित करण्यात येऊन महावितरण त्यांची कामे करत असतात. असे असतानाही पालघर पूर्वेकडे गांधीनगर आंबेडकर नगर व परिसरातील वीज पुरवठा काम करण्याच्या हेतूने शनिवारी खंडित करण्यात आला. मात्र याबाबत वीज ग्राहकांना कुठल्याही प्रकारची सूचना न देता हे काम करण्यात आले.शनिवारी सकाळी दहा ते दुपारी साधारण साडेतीन ते पावणेचार वाजेपर्यंत वीजपुरवठा खंडित करण्यात आला होता. याबाबत महावितरणच्या अधिकाऱ्यांकडे नागरिकांनी विचारणा केली असता त्यांना उडवाउडवीची उत्तरे देण्यात आल्याने नागरिकांमध्ये महावितरणच्या या कृतीबद्दल संताप व्यक्त करण्यात येत आहे.भयंकर उकाड्याने आधीच नागरिक त्रस्त आहेत. त्यातच गांधीनगर भागात मोठया प्रमाणात मुस्लिम समाजाचे वास्तव्य आहे.पवित्र रमजान महिना सुरू असून अनेकांची उपवास सुरू आहेत. त्यात सूर्य आग ओकत असल्याने प्रचंड उकाड्यात सहा तासापेक्षा अधिक वेळेपेक्षा वीजपुरवठा खंडित झाल्याने आबाल वृद्धांपासून लहान बालकांच्या हालाला पारावर उरला नाही. वीज पुरवठा खंडित करण्याचा शुक्रवारचा दिवस असताना महावितरणने वीज पुरवठा शनिवारी खंडित करून सर्वसामान्य नागरिकांचे हाल केले.

कुंडेवहाळ डोंगरावरील हातभट्टी पोलिसांनी केली उद्ध्वस्त

■ **पनवेल** : पनवेल तालुक्यातील कुंडेवहाळ डोंगरावरील गावठी हातभट्टी दारू कारखाना पनवेल शहर पोलिसांनी उद्ध्वस्त केला असून, २५० लिटरच्या २२ बॅरलमधून ५५०० लिटर गावठी हातभट्टी दारू व दारू निर्मितीसाठी लागणारे साहित्य नष्ट करण्यात आले आहे. ही गावठी दारूची भट्टी कुंडेवहाळ येथील रोशन वास्कर याची असल्याची माहिती पोलिसांना प्राप्त झाल्याने त्यात किती आरोपींचा सहभाग आहे याचा अधिक तपास पनवेल शहर पोलीस करीत आहेत.

कुंडेवहाळ गावच्या हद्दीतील जंगलात दारू ही विक्रीसाठी गाळण्याचा व बनिवण्याचा धंदा करीत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यावर पनवेल शहर पोलीस ठाण्याचे व.पो.नि. नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली शनिवारी गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी येथे धाड मारली असता तेथे २५० लिटरच्या २२ प्लास्टीकच्या पूर्ण भरलेल्या बॅरलमध्ये एकूण १ लाख १० हजार रुपये किमतीचे ५५०० लिटर कच्च्या दारूचे नवसागर द्रव तसेच दारू बनवण्यासाठी लागणारे साहित्य आढळले. यामध्ये पिवळ्या रंगाचे नरसाळे, पंप, स्टोव्हची टाकी, स्टोव्हचा बर्नर, गावठी दारू वाहण्यासाठी टायर-ट्युबचे तुकडे, कच्चा दारूचे नवसागर द्रव अशा साहित्याचा समावेश आहे. हा सारा ऐवज पोलिसांनी जप्त केला आहे. लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने वरिष्ठांनी दिलेल्या आदेशानुसार या अवैध धंद्यांवर कारवाई करण्यात आली.

कारची स्कूटीला धडक : दाम्पत्याचा मृत्यू

जखमी बालिकेची प्रकृती गंभीर

■ **नवी मुंबई** : बोकडविरा गावाकडून उरणच्या दिशेने जाणाऱ्या कारने स्कूटीला धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात स्कूटीवरील दाम्पत्याचा मृत्यू, तर त्यांची ३ वर्षीय मुलगी गंभीर जखमी झाल्याची घटना शनिवारी रात्री उरण रेल्वे स्टेशनजवळ घडली. या अपघातानंतर कार चालक पळून गेला असून उरण पोलिसांनी त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे. पवित्र मोहन बराल (४०) व स्मिता पवित्र बराल (३७) अशी या अपघातात मृत्यू झालेल्यांची नावे असून ते उरणमधील बोरी पाखाडी भागात राहत होते. शनिवारी रात्री बराल दाम्पत्य त्यांच्या ३ वर्षीय मुलीसोबत स्कूटीवरून उरणकडून बोकडविराकडे कामानिमित्त जात होते. यावेळी त्यांची स्कूटी उरण रेल्वे स्टेशन जवळ आली असताना समोरून येणाऱ्या भरधाव कारने त्यांच्या स्कूटीला जोराची धडक दिली. या अपघातात स्कूटीचे दोन तुकडे होऊन स्कूटीवरील बराल दाम्पत्यासह त्यांची तीन

वर्षांची मुलगी दूरवर फेकली गेली. या भीषण अपघातात तिघेही गंभीर जखमी झाल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र पवित्र व स्मिता या दोघांचा मृत्यू झाला, तर त्यांची ३ वर्षीय मुलगी गंभीर जखमी झाल्याने तिला बेलापूर येथील अपोलो हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. तिची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती पोलिसांनी दिली.